## ‘जैश-ए-मोहम्मद’च्या दोन दहशतवाद्यांना अटक



**मुंबई :** येथील स्थानिक पोलीस आणि दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने एक मोठी संयुक्त कारवाई केली आहे. त्यांनी जैश-ए-मोहम्मद या दहशतवादी संघटनेशी संबंधित असल्याच्या संशयावरून मोसाब अहमद उर्फ कलाम आणि मोहम्मद हमद कालरा यांना अटक केली. ते दिल्लीत ‘टॉय कार’ बॉम्बस्फोट घडवण्याच्या तयारीत होते. सुदैवाने कोणतीही घटना घडण्यापूर्वीच त्यांना पकडण्यात आले. महाराष्ट्र एटीएस आणि दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने केलेल्या संयुक्त कारवाईत मोसाब आणि हमाद या दोन संशयितांना कुर्ला आणि कडवाली येथे ताब्यात घेण्यात आले. पुढील तपासासाठी त्यांना दिल्लीला घेऊन जाणार आहेत. त्यांना न्यायालयात हजर केले जाईल. तेथे कोठडी सुनावण्यात येईल आणि त्यांची चौकशी केली जाईल. दरम्यान, एक मोठा दहशतवादी कट उधळला गेल्याने दिलासा मिळाला आहे.


रायगड, नवी मुंबई

# रामप्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २५७
www.ramprahar.com

◆ सोमवार, ६ एप्रिल २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


**अंतरंग**


सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटींची विकासकामे/२

पेण कोलेटी येथील अंबा नदीपात्रात मृतदेह/५

आयपीएलमध्ये वैभव-यशस्वी जोडीने इतिहास घडवला/८


# आणखी एका भोंदूची विकृती उघड

## महिलांना फसवून अत्याचार; कळंबोलीतील नराधम गजाआड



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्यात सध्या भोंदूबाबा अशोक खरात प्रकरण चर्चेत असताना आता अशीच एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कळंबोलीतील अब्दुल रशीद उर्फ बाबाजान या भोंदूबाबाने काही महिलांवर काळी जादू करण्याच्या बहाण्याने लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाला असून भोंदूच्या मुसक्या पोलिसांनी आवळल्या आहेत.

अब्दुल रशीद उर्फ बाबाजान गोड बोलून महिलांवर छाप पाडायचा, तर कधी काळ्या जादूची भीती दाखवायचा तसेच आर्थिक, वैवाहिक समस्या दूर करतो सांगून फसवायचा. काळी जादू करण्याच्या बहाण्याने त्याने खालापूर येथे विवाहित महिलेवर अत्याचार केला, तर सांताक्रुझ येथे आई व मुलीवर बलात्कार केला.

अब्दुल रशीद हा महिलांना एकट्याच बोलावत असे. खालापूर येथे निर्जनस्थळी बांधलेल्या फार्महाऊसवर तो महिलांना घेऊन जात होता तसेच मध्यरात्री काळी जादू करण्याचे सांगत तो महिलांच्या अंगावरील वस्त्रे काढायला सांगायचा आणि पूजा करायला भाग पाडायचा. महिलांनी विरोध केला, तर त्यांना जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्यावर अत्याचार करीत असे. त्याला अखेर अटक करण्यात आली आहे.

कळंबोलीतसुद्धा भोंदूबाबा महिलांना भेटायला बोलवायचा. समस्या दूर होतील या आशेने लोक त्याला भेटायला जात होते. लोकांची वाढती गर्दी पाहून त्याला हाकलून देण्यात आले. गुन्हे दाखल झाल्यावर भोंदूने कुटुंबासह तेथून पळ काढला.

बाबाजान हा गेल्या अनेक वर्षांपासून लोकांना चुना लावण्याचे काम करीत होता. महिलांबरोबर पुरुषही त्याच्या तत्वज्ञानाला बळी पडले आहेत. अनेक पुरुषांकडून त्यांने पैसे उकळलेले आहेत. सध्या दोन महिलांनी तक्रार दिली असली तरी अजून बऱ्याच महिला त्याच्या वासनेच्या शिकार झाल्याचा दावा करण्यात येत आहे.


**(संबंधित वृत्त पान ७ वर..)**


## अशोक खरातची ईडी चौकशी होणार -मुख्यमंत्री



**नाशिक : प्रतिनिधी**

सध्या राज्यासह देशात चर्चेत असलेल्या नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाबद्दल रोज नवनवीन माहिती समोर येत आहे. खराच्या काळ्या साम्राज्याचा पर्दाफाश करण्यासाठी विशेष तपास पथक अहोरात्र प्रयत्न करत आहे. अशातच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी खरात प्रकरणातील सर्व व्यवहारांची ईडी चौकशी होणार असल्याची माहिती दिली.

नाशिक येथे प्रसारमाध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, अशोक खरात प्रकरणाचा तपास सुरू असून त्याच्यावर आतापर्यंत एकूण १२ गुन्हे दाखल झाले आहेत. खरातच्या संपत्तीची आणि गैरव्यवहारांची चौकशी केली जाईल. या प्रकरणात काही लोक राजकारण करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण मी स्पष्ट सांगतो की अशा प्रकरणाबाबत सरकारला जे करायला पाहिजे ते सरकार करत आहे.

खरात प्रकरणातील व्यवहारांबाबत नक्कीच ईडी चौकशी होणार आहे. त्याबाबत ईडीने त्यांची कारवाई सुरू केलेली आहे. एकदा खरातच्या जमिनी कुठे-कुठे आहेत याची माहिती समजली की नियमानुसार जे-जे करावे लागेल ते आम्ही करणार आहोत, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

अशोक खरात प्रकरणातील सीडीआर कोणालाही प्राप्त करून घेण्याचा अधिकार नाही. तो अधिकार फक्त तपास यंत्रणांनाच आहे, मात्र या प्रकरणातील सीडीआर कसा लीक झाला? तो कोणी लीक केला? या संदर्भातील चौकशी राज्य सरकार करणार आहे. अशा प्रकारच्या प्रकरणात फक्त आरोप-प्रत्यारोप करून चालत नाही. ज्यांच्या विरोधात सबळ पुरावा असेल त्यांच्यावर कारवाई होईलच, मात्र कोण-कोणाशी बोलले या आधारावर आपली क्रिमिनल जस्टिस सिस्टम चालत नाही, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी स्पष्ट केले.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी केलेल्या ईडी चौकशीच्या घोषणेने भोंदूबाबा अशोक खरातचा पाय आणखी खोलात गेला आहे. अनेकांना घाम फोडणाऱ्या आणि त्रस्त करणाऱ्या ईडीचा अर्थात सक्तवसुली संचालनालयाचा ससेमिरा आता खरातच्या मागे लागण्याची शक्यता आहे, तर त्याचवेळी अनेक संशयास्पद कोट्यवधीचे व्यवहार रडारवर आले आहेत. हे व्यवहार नेमके कुणाचे आहेत? या व्यवहारात कोण कोण आहेत? याची इत्यंभूत माहिती समोर येणार आहे. त्यामुळे अनेकांचे धाबे दणाणले आहेत.

# अवकाळी पावसामुळे राज्यातील दोन लाख हेक्टरवरील पिकांना फटका

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या अवकाळी पावसाने आणि गारपिटीने राज्याला झोडपून काढले आहे. कृषी विभागाने दिलेल्या प्राथमिक माहितीनुसार राज्यातील तब्बल २९ जिल्ह्यांना या पावसाचा फटका बसला असून सुमारे दोन लाख चार हजार ८३५ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे. यात नाशिक, धुळे, अहिल्यानगर आणि जळगाव या चार जिल्ह्यांत सर्वाधिक हानी झाली आहे.

१४ मार्च ते २ एप्रिल या कालावधीत झालेल्या या पावसामुळे केळी, गहू, मका, हरभरा, आंबा, ज्वारी, टरबूज, भाजीपाला, कलिंगड, डाळिंब, कांदा, संत्रा आणि द्राक्ष या पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. हातातोंडाशी आलेला घास हिरावला गेल्याने बळीराजा पूर्णपणे कोलमडून गेला आहे.

नाशिकमधील निफाड आणि येवला तालुक्यात द्राक्ष बागांचे प्रचंड नुकसान झाले आहे. काढणीला आलेल्या द्राक्षांना तडे गेल्यामुळे व्यापाऱ्यांनी खरेदी नाकारली आहे. परिणामी शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. छत्रपती संभाजीनगरात गेल्या १४ दिवसांत जिल्ह्यात ११ हजार हेक्टरवरील पिके बाधित झाली असून सुमारे १८ हजार शेतकऱ्यांना याचा फटका बसला आहे. नंदुरबार जिल्ह्यातील ६२ गावांमधील ९५४ शेतकऱ्यांच्या ८३२ हेक्टरवरील ज्वारी, मका आणि कांदा पिकांचे नुकसान झाले आहे.

नांदेडच्या बिलोली तालुक्यातील सगरोळी परिसरात वादळी वाऱ्यासह गारपीट झाली. घरांवरील छप्परे उडाली असून शेतीचेही मोठे नुकसान झाले आहे. यवतमाळ जिल्ह्यातील सहा तालुक्यांमधील १४ गावांत १९० हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले असून पाच घरांची पडझड झाली आहे.

एनडीआरएफच्या निकषानुसार ३३ टक्क्यांपेक्षा जास्त नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना भरपाई दिली जाणार आहे. सरकारने महसूल आणि कृषी विभागाला पंचनामे युद्धपातळीवर करण्याचे आदेश दिले आहेत.

### सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी -उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

**पुणे :** उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी बारामती तालुक्यातील पणदरे परिसरातील नुकसानग्रस्त भागाची प्रत्यक्ष बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधला. ‘गारपिटीने मोठे संकट ओढवले आहे. मी प्रत्यक्ष नुकसानीचा आढावा घेतला असून शासनाकडून शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आणि त्वरित मदत मिळवून देण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू. या संकटकाळात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे,’ असे उपमुख्यमंत्री पवार यांनी आश्वस्त केले.



## निवडक

### नेपाळमध्ये इंधनाचा तुटवडा; आठवड्यातून दोन दिवस सुट्टी

**काठमांडू :** मध्य-पूर्वेतील इराण-अमेरिका युद्ध आणि लाल समुद्रातील तणावाचा मोठा फटका आता शेजारील देश नेपाळला बसला आहे. नेपाळमध्ये इंधनाचा तीव्र तुटवडा निर्माण झाल्यामुळे इंधनाची बचत करण्यासाठी नेपाळ सरकारने आता आठवड्यातून दोन दिवस (शनिवार आणि रविवार) सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या किमती गगनाला भिडल्या आहेत आणि नेपाळला होणारा इंधन पुरवठा विस्कळीत झाला आहे. त्यामुळे हा निर्णय घेण्यात आला आहे.

### नितीश कुमार १० एप्रिलला राज्यसभा सदस्यत्वाची घेणार शपथ

**पाटणा :** बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार राज्यसभेत प्रवेश करण्यास सज्ज झाले आहेत. बिहार भाजपचे प्रदेशाध्यक्ष संजय सरावगी यांनी, मुख्यमंत्री नितीश कुमार १० एप्रिलला राज्यसभा खासदार म्हणून शपथ घेतील. त्यानंतर भाजपचे केंद्रीय नेतृत्व आणि एनडीए पुढील निर्णय घेईल, असे सांगितले. त्यामुळे पुढील मुख्यमंत्र्यांबाबतचा निर्णय लवकर घेतला जाऊ शकतो.

## प. बंगालमध्ये परिवर्तनाची लाट -पीएम मोदी

**कूचबिहार : वृत्तसंस्था**

पश्चिम बंगालमधील कूचबिहार येथे आयोजित सभेतून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यातील सत्ताधारी तृणमूल काँग्रेस सरकारवर जोरदार टीका केली. बंगालमध्ये परिवर्तनाची लाट सुरू झाली असून घुसखोरांना बाहेर काढले जाईल, असे पंतप्रधान मोदी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान मोदी म्हणाले की, कूचबिहारमधील सभा ही बंगालमधील जनतेच्या बदलाच्या मनःस्थितीचे प्रतीक आहे. राज्यात टीएमसीच्या भ्रष्टाचार, हिंसा आणि प्रशासनातील अपयशामुळे जनतेमध्ये संताप आहे. काही दिवसांपूर्वी कोलकात्यातील ब्रिगेड ग्राउंडवरून बंगालमध्ये परिवर्तन महाअभियानाची सुरुवात करण्यात आली होती. त्या सभेला मिळालेला मोठा प्रतिसाद पाहून टीएमसी घाबरली आहे आणि आता कूचबिहारच्या सभेने त्या परिवर्तनाच्या बिगुलावर शिक्कामोर्तब केले आहे.



पंतप्रधान मोदी यांनी टीएमसीवर आरोप करताना म्हटले की, एकीकडे टीएमसीचे कटमनी, भ्रष्टाचार आणि सिंडिकेट राज आहे, तर दुसरीकडे विकास आणि विश्वास देणारी भाजप आहे. निवडणुकीनंतर भ्रष्टाचार आणि गुन्हेगारी प्रकरणांमध्ये कठोर कारवाई केली जाईल. ४ मेनंतर कायदा आपले काम करेल. कितीही मोठा गुन्हेगार असला तरी यावेळी न्याय होणार.

पंतप्रधान मोदींनी संदेशखाली प्रकरणाचा उल्लेख करत महिलांच्या सुरक्षेचा मुद्दा उपस्थित केला. त्यांनी सांगितले की, महिलांच्या सुरक्षा, सन्मान आणि सक्षमीकरणासाठी भाजप सरकार काम करेल. देशातील तीन कोटी महिलांना ‘लखपती दिदी’ बनवण्यात आले. लोकसभा आणि विधानसभांमध्ये महिलांना ३३% आरक्षण देण्याचा कायदा करण्यात आला. २०२९च्या लोकसभा निवडणुकीपासून महिलांना त्याचा फायदा मिळेल.

एकेकाळी बंगालची गणना देशातील सर्वात विकसित राज्यांमध्ये केली जात असे. व्यापार, उद्योग, कला किंवा संस्कृती असे कोणतेही क्षेत्र असो, बंगाल त्यात नेहमीच अग्रेसर होते, मात्र त्यानंतरच्या काळात आधी डाव्यांच्या राजवटीत आणि नंतर तृणमूल काँग्रेसच्या राजवटीत या विकासाची झळाळी हळूहळू क्षीण होत गेली. पूर्वी बंगालमधील लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षा अधिक होते, पण आता परिस्थिती इतकी खालावली आहे की, येथील सामान्य लोकांचे उत्पन्न राष्ट्रीय सरासरीपेक्षाही खाली घसरले आहे. देशातील इतर राज्ये वेगाने प्रगती करत असताना तृणमूल काँग्रेसने बंगालला मात्र मागे ढकलले, अशी टीकाही पंतप्रधानांनी केली.

## तलावात बुडून चार तरुणांचा मृत्यू

**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीनगर शहरालगत असलेल्या हर्सूल तलावात पोहण्यासाठी गेलेल्या चार तरुणांचा बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना रविवारी (दि.५) घडली.

हर्सुल तलावात तरुण मुले बुडाल्याची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पथकाच्या मदतीने बचावकार्य करत तिघांचे मृतदेह तुरुंगातून बाहेर काढण्यात आले. दरम्यान, तलावाच्या दुसऱ्या बाजूला आणखी एक तरुण बुडाल्याचे कळल्यावर तेथेही शोधमोहीम राबवली असता चौथ्या तरुणाचाही मृतदेह पाण्यात आढळून आला. चौघांचेही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी घाटी रुग्णालयात पाठवण्यात आले असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## महाडमध्ये शिक्षकाचा विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार, गुन्हा दाखल

**महाड : रामप्रहर वृत्त**

महाडमध्ये खासगी शिकवणी वर्गाच्या शिक्षकाने विद्यार्थ्यावर वारंवार लैंगिक अत्याचार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी महाड शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत मिळालेल्या माहितीनुसार ही घटना महाड येथील गांधी क्लासेसमध्ये घडली आहे. या प्रकरणातील पीडित मुलगा सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात इयत्ता दहावीमध्ये शिकत होता. क्लासेसचा मालक आणि शिक्षक सुनील गांधी याने विद्यार्थ्यावर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.

पीडित विद्यार्थ्याने दिलेल्या तक्रारीनुसार आरोपी शिक्षक सुनील गांधी हा शिकवणीच्या बहाण्याने मुलाच्या गुप्तांगाला स्पर्श करणे आणि अश्लील चाळे करत असे. इतकेच नव्हे तर, क्लासच्या वरच्या मजल्यावर असलेल्या स्वतःच्या बेडरुममध्ये नेऊन त्याने विद्यार्थ्यासोबत अनैसर्गिक आणि अश्लील कृत्य केल्याचेही समोर आले आहे. या सलग होत असलेल्या त्रासामुळे पीडित मुलगा प्रचंड मानसिक तणावाखाली होता. अखेर त्याने धाडस करून हा सर्व प्रकार समोर आणला.

या प्रकरणी पीडित मुलाच्या तक्रारीवरून महाड शहर पोलिसांनी तत्काळ दखल घेतली आहे. आरोपी शिक्षक सुनील गांधी याच्या विरोधात बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण (पोक्सो) आणि भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास सुरू आहे.

## पनवेलमधील विचुंबे येथे जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धा रंगली

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षाचे औचित्य साधून तसेच विचुंबे ग्रामपंचायतीचे सरपंच प्रमोद भिंगारकर यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (दि.४) विचुंबे येथे भव्य जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. रायगड जिल्हा कबड्डी असोसिएशनच्या मान्यतेने पार पडलेल्या या स्पर्धेचे उद्घाटन भाजपचे राज्य परिषद सदस्य अरुणशेठ भगत यांच्या हस्ते झाले.



विचुंबे येथील विठ्ठल-रखुमाई मैदानात रंगलेल्या या स्पर्धेने क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतले. संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले. यावेळी रायगड जिल्हा परिषद सदस्य आत्माराम भस्मा, प्राची जाधव, पनवेल पंचायत समितीचे उपसभापती भूपेंद्र पाटील, सदस्य नीलम भिंगारकर, माजी जिल्हा परिषद सदस्य अमित जाधव तसेच बळीराम पाटील, किशोर सुरते, अविनाश गायकवाड यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते, क्रीडाप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मान्यवरांनी आपल्या मनोगतातून खेळाडूंना प्रोत्साहन देत लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव केला. या स्पर्धेच्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील कबड्डी संघांना आपले कौशल्य प्रदर्शित करण्याची संधी मिळाली. यावेळी उपस्थित मान्यवरांनी सरपंच प्रमोद भिंगारकर यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

## मुंबई-पुणे एक्सप्रेस वे होणार १० पदरी

**मुंबई : प्रतिनिधी**

वाढत्या वाहतुकीमुळे कायम कोंडीचा सामना करणाऱ्या मुंबई-पुणे एक्सप्रेस वेवर आता मोठा बदल होणार आहे. या द्रुतगती मार्गाचे १० पदरीकरण करण्याचा महत्त्वाचा निर्णय महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीए) घेतला असून यामुळे प्रवास अधिक वेगवान आणि सुरक्षित होणार आहे.

काही दिवसांपूर्वी एक्सप्रेस वेवर घाटात एक प्रोपोलिन गॅसने भरलेला टेम्पो उलटला होता. त्यामुळे प्रचंड वाहतूक कोंडी झाले आणि नागरिकांना तिकडेच दोन दिवस अडकून राहावे लागले. अनेक पर्यायी मार्गांचा शोध घेत नागरिकांनी आपली सुटका करून घेतली. अशी परिस्थिती पुन्हा उद्‌भवू नये म्हणून सरकारने हा निर्णय घेतला आहे.

या प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर निधी लागणार असून तो वित्तीय संस्थांकडून कर्जाच्या माध्यमातून उभारला जाणार आहे. या कर्जाची परतफेड करण्यासाठी सध्याच्या टोल वसुलीची मुदत १५ वर्षांनी वाढवण्याचा प्रस्ताव आहे.

दरम्यान, एक्सप्रेस वेवरील महत्त्वाचा १३ किमीचा ‘मिसिंग लिंक’ प्रकल्प लवकरच सुरू होण्याची शक्यता आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास घाटातील वळणे आणि अपघातप्रवण भाग टाळून प्रवास अधिक सुरक्षित आणि जलद होणार आहे. शिवाय मुंबई-पुणे अंतर कमी होऊन वेळेची बचत होईल.

विस्तारीकरणाचे काम सुरू असताना वाहतूक विस्कळीत होऊ नये यासाठी विशेष नियोजन करण्यात येणार आहे. टप्प्याटप्प्याने काम करून प्रवाशांना कमीत कमी अडचण येईल याची काळजी एमएसआरडीएकडून घेतली जाणार असल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे.



### वाहतूक सुलभतेसाठी निर्णय

मिळालेल्या माहितीनुसार या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे काम येत्या पावसाळ्यानंतर सुरू होणार आहे. टप्प्याटप्प्याने काम पूर्ण करत पुढील तीन वर्षांत म्हणजेच २०२९-३०पर्यंत संपूर्ण विस्तार पूर्ण करण्याचे उद्दिष्ट आहे. सध्या असलेल्या मार्गावर वाढत्या वाहनसंख्येमुळे निर्माण होणारी कोंडी लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आला आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात वाहनांची वर्दळ असते. वीकेण्ड आणि सलग सुट्ट्यांच्या काळात तर वाहनांच्या रांगा लागून कोंडी होती. त्यावर उपाय म्हणून एक्सप्रेस वे १० पदरी करण्यात येणार आहे.

# सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी ३५ हजार कोटींची विकासकामे होणार -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**नाशिक : प्रतिनिधी**

प्रभू श्रीराम यांच्या पदस्पर्शाने पुनीत झालेल्या नाशिक त्र्यंबकेश्वरमध्ये पुढील वर्षी होणारा सिंहस्थ कुंभमेळा भव्य व अविस्मरणीय करण्यासाठी ३५ हजार कोटी रुपयांची विविध विकास कामे करण्यात येत आहेत. भाविकांना विविध सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नियोजन करण्यात आले असून या प्रक्रियेत साधू- महतांचे मार्गदर्शन महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



अखिल भारतीय संत समिती-राष्ट्रीय कार्य समितीच्या दोन दिवसीय बैठकीचा समारोप तपोवनातील श्री स्वामी नारायण मंदिर येथे झाला. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. कार्यक्रमाला कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, अखिल भारतीय संत समिती अध्यक्ष अविचल देवाचार्यजी, महंत श्री ग्यान देवसिंग महाराज, अखिल भारतीय आखाडा परिषदेचे अध्यक्ष रविंद्रपुरी महाराज, संत निवृत्ती महाराज, रावसाहेब महाराज गोसावी, पुरुषोत्तम महाराज देहूकर, अशोक तिवारी, श्री यतिंद्रानंद गिरीजी महाराज, जनार्दनहरी महाराज, स्वामी संविदानंद सरस्वती, जितेंद्रानंद स्वामी, ब्रह्मेशनंद महाराज, राजेंद्र दास, महंत दुर्गादास महाराज, भक्तिचरणदास महाराज आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, भाविकांना गोदावरीच्या निर्मळ आणि प्रवाही पाण्यात स्नान करता यावे, यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. त्र्यंबकेश्वर येथे गोदावरीचा प्रवाह बारमाही व्हावा यासाठी प्रयत्न करण्यात येत आहे. कुशावर्तासाठी जलशुद्धीकरण प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. त्र्यंबकेश्वर रस्ता, नाशिक परिक्रमा मार्ग, रेल्वे स्थानकावरील सुविधा, घाटांची संख्या आणि लांबी वाढविणे, जुन्या मंदिरांचे संवर्धन, मंदिराकडे जाणाऱ्या मार्गांचे रुंदीकरण, ओझर विमानतळाचे विस्तारीकरण आदी विकास कामे सुरू आहेत. साधूग्रामसाठी कायमस्वरूपी जमीन अधिग्रहणाचा निर्णय घेण्यात आला आहे. साधूग्राममध्ये आवश्यक सर्व पायाभूत सोयीसुविधा उपलब्ध करून देण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

तसेच कुंभमेळ्याकरीता प्रयागराजच्या धर्तीवर नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरण स्थापन करण्यात आले आहे. कुंभमेळ्याच्या सूक्ष्म आणि नेटक्या नियोजनासाठी नाशिक येथील अधिकाऱ्यांच्या पथकाने प्रयागराजचा दौरा केला होता. मागील कुंभमेळ्याच्या तुलनेत यंदा दहा पट अधिक भाविक येण्याची शक्यता असून त्यादृष्टीने नियोजन करण्यात येत आहे. विकासकामे करतांना साधू, महंत आणि आखाड्यांकडून आलेल्या सूचनांचाही स्वीकार करण्यात येईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

संत शक्ती ही सज्जनशक्ती असून साधू संतांनी भारतीय संस्कृती टिकवून ठेवल्याचे नमूद करून मुख्यमंत्री म्हणाले की, जगातील अन्य संस्कृती नामशेष होत असताना भारतीय संस्कृती टिकून राहिली. ही प्राचीन असण्यासोबतच नित्यनूतनही आहे. हेच भारतीय संस्कृतीचे वैशिष्ट्य आहे. साधू संतांनी या प्रवाहातील वाईट बाबी बाजूल्या सारल्याने संस्कृतीची निरंतरता टिकून आहे. महाराष्ट्रातील वारकरी संप्रदायानेदेखील अनेक आक्रमणांना सामोरे जात वारीची परंपरा टिकवून ठेवली. हीच परंपरा कुंभमेळ्यात प्रतिबिंबीत होते.

कुंभमेळा भारतीय अध्यात्मिक संस्कृतीचा सर्वात मोठा सोहळा आहे. मन आणि आत्म्याच्या शुद्धीकरणाचा हा सोहळा आहे. विचारांच्या प्रदूषणाला दूर सारून भारतीय संस्कृतीला प्रवाहीत करण्याचे हे पर्व आहे. या सोहळ्यात सर्व जाती-धर्माचे भाविक सहभागी होत असल्याने कुंभमेळा हा राष्ट्रीय एकात्मतेचे आणि भारतीय संस्कृतीचे प्रतिक आहे, असेही त्यांनी सांगितले. कुंभमेळ्यात केवळ पवित्र स्नान होत नाही, तर साधू संतांचे मार्गदर्शन, विचारांचे आदान-प्रदान होत असल्याने पुढील वर्षी होणारा कुंभमेळा अविस्मरणीय होईल, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. महाराष्ट्र धर्मस्वातंत्र्य विधेयकामुळे समाजातील गैरप्रकारांना आळा बसेल तसेच भोंदूगिरी करणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येईल, असे मुख्यमंत्री म्हणाले.

यावेळी अविचल देवाचार्य, जितेंद्रानंद स्वामी, रवींद्रपुरी महाराज, तुषार भोसले यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी आमदार ॲड. राहुल ढिकले, महापौर हिमगौरी आडके-आहेर, उपमहापौर विलास शिंदे, स्थायी समितीचे सभापती मच्छिंद्र सानप, माजी आमदार बाळासाहेब सानप, महानगरपालिकेचे नगरसेवक यांच्यासह देशभरातून आलेले साधू, संत, महंत उपस्थित होते.

# सलग सुट्ट्यांमुळे मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडी

**माणगाव : प्रतिनिधी**

गुड फ्रायडे, शनिवार आणि रविवार या सलग तीन दिवसांच्या सुट्टयांमुळे मुंबई-गोवा महामार्गावर माणगाव शहरातील बाजारपेठेत वाहतूककोंडीने भीषण रूप धारण केले. पुणे, विदर्भ, मराठवाडा तसेच मुंबई-ठाणे येथून कोकणाकडे निघालेले पर्यटक, परत गावाकडे जाणारे कोकणवासीय आणि इतर नागरिक यांच्या वाहनांच्या तासन्तास रांगा जागच्या जागीच होत्या.




या मार्गावरील अरुंद रस्ता, वाहनांची मोठी वर्दळ आणि चालू असलेली अपूर्ण बायपास कामे यांच्या संयोगाने शहरातील बाजारपेठेत वाहतूकच ठप्प झाल्याचे दृश्य सामान्य नागरिकांसमोर उभे राहिले. त्यामुळे माणगावात वाहतूक कोंडीचा शुक्रवारी शापच दिला गेला.

माणगाव, इंदापूर येथे उभारला जाणारा बायपास हा महामार्गावरील वाहतूक कोंडी दूर करण्याचा मुख्य मार्ग आहे. ११ किमी लांबीच्या या बायपाससाठी काम पूर्ण करण्यासाठी १८ महिन्यांचा कालावधी निश्चित करण्यात आला होता.

तरीही गेल्या अनेक वर्षांत ठेकेदार बदलले गेले, काम अर्धवट राहिले व त्यामुळे हजारो प्रवाशांच्या 'सुट्टीच्या आनंदाचा' प्रवास तणावाचा राष्ट्रीय सडक मार्ग' म्हणून वाहतूक कोंडीचा शाप बनला. इंदापूर-माणगाव बायपास १ जूनपर्यंत वाहतुकीसाठी खुला करण्याचे आश्वासन रायगडच्या खासदारांनी दिले असतानाही जमिनीवरची स्थिती 'जैसे थे' आहे, अशी भावना स्थानिकांमध्ये व्यक्त होत आहे.

पूर्वी अभियंत्यांनीही बायपास पूर्ण होण्यासाठी किमान तीन वर्षांचा कालावधी लागू शकतो. माणगाव बायपास सारख्या महत्त्वाच्या प्रकल्पात अनेक ठेकेदार बदलले गेल्याने ठेकेदारांच्या अपूर्ण वचन बद्धता, असमर्थ व्यवस्थापन व कामाच्या गुणवत्तेतील उणीव यामुळे प्रकल्पांचा वेळ वाया जातो, त्यामुळे शासनाने ठेकेदारांवर कठोर दंड, टाकाऊ कालावधींसाठी वारंवार ठेकेदार बदलण्याची धोरणे आणि प्रकल्पांची ऑनलाईन पारदर्शी नियंत्रण व्यवस्था लागू करणे गरजेचे ठरते.

मुंबई-गोवा महामार्ग कोकणच्या आर्थिक विकासाचा 'मुख्य दुवा' मानला जातो, तर त्याच दुव्यावर अरुंद रस्ते, अपूर्ण बायपास आणि वारंवार होणाऱ्या वाहतूककोंड्या यामुळे नागरिकांचा जीव धोक्यात येतो.तासन्तास अडकून पडलेल्या गाड्यांमध्ये लहान मुले, महिला आणि ज्येष्ठांचा पाणी, अन्न आणि इंधनाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे नागरिकांच्या तक्रारी केवळ वाहतूक ताण यापुरत्या मर्यादित न राहता आरोग्य व सुरक्षिततेच्या प्रश्नांपर्यंत वाढत असून अशा परिस्थितीत प्रशासनाने केवळ 'ट्रॅफिक ड्यूटीमधील कर्मचाऱ्यांच्या श्रमावर' भर देऊन चालणार नाही, तर प्रकल्प पूर्ण करण्याच्या वेळापत्रकात खरी गांभीर्याने बदल घडवून आणणे भाग पडणार आहे.

कोकणच्या नागरिकांसाठी मुंबई-गोवा महामार्ग केवळ वाहतुकीचा मार्ग नसून आरोग्य, शिक्षण, व्यवसाय व आपत्कालीन वैद्यकीय सेवांचा जीवन दोर आहे. शासनाने नागरिकांच्या वेळेची आणि वाहतुकीची खरी किंमत ओळखणे आणि त्यानुसार बायपास काम तत्काळ, निर्धारित कालावधीत पूर्ण करण्याची जबाबदारी घेणे भाग पडणार आहे.

# लग्नाच्या वरातीत रक्ताचा सडा

## तरुणाकडून काका आणि चुलत भावाची हत्या

**वर्धा : प्रतिनिधी**

वर्धा शहरातील महिला आश्रम परिसरातील हनुमान मंदिराजवळ एक थरकाप उडवणारी घटना घडली आहे. येथे एका तरुणाने लग्नाची वरात सुरू असताना सख्ख्या काका आणि चुलत भावावर चाकूने सपासप वार करून निर्घृण हत्या केली.

प्रभाकर भलमे आणि नितीन भलमे असे मयत पावलेल्या बापलेकाची नावे आहेत. हल्लेखोर आरोपी हा अल्पवयीन आहे. घटनेच्या दिवशी शनिवारी रात्री भलमे यांच्या नातेवाईकांचे लग्न होते. नवरदेव बोहल्यावर चढला होता. सगळीकडे आनंदाचे वातावरण होते. बँड वाजत होता. वऱ्हाडी नाचत होते. ही वरात हनुमान मंदिरात दर्शन घेऊन जात असताना संपत्तीच्या वादातून पुतण्याने काका आणी चुलत भावावर चाकू हल्ला केला.

या हल्ल्यानंतर उपस्थित नातेवाईकांनी तातडीने दोघांना सेवाग्राम रुग्णालयात दाखल केले, मात्र डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले आहे.

वर्ध्याच्या नजीक असलेल्या बरबडी येथे भलमे परिवारात काही दिवसापासून संपत्तीचा वाद सुरू होता. आठ महिन्यांपूर्वीदेखील अल्पवयीन आरोपी आणि मृतकांमध्ये याच कारणातून भांडण झाले असल्याची माहिती आहे. त्यात दोन्ही बाजुने गुन्हे दाखल करण्यात आले होते. त्यानंतर, दोघांना मारण्याचा कट अल्पवयीन आरोपीकडून आखला जात होता, त्यासाठी त्याने ऑनलाईन चाकू देखील मागविल्याची माहिती समोर आली आहे. त्यातच, घरातील लग्नसोहळ्यात रात्री सर्वांना अचंबित करणारी घटना घडली.

अल्पवयीन आरोपी नातेवाईकाच्या लग्नात आला, त्याने संधी साधून वरात सेवाग्राम मार्गावर हनुमान मंदिराजवळ पोहचताच काका आणि चुलत भावावर चाकूने सपासप वार केले. यात दोघेही गंभीर जखमी झाले असून त्यांना सेवाग्राम येथील रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र उपचारापूर्वीच येथे डॉक्टरांनी दोघांनाही मृत घोषित केले.

# महाडमध्ये घराला आग

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरातील कातारी मोहल्ला परिसरात एका घराला आज सकाळी अचानक आग लागून मोठे नुकसान झाले. मात्र महाड नगरपालिकेच्या अग्निशमन हे तात्काळ घटनास्थळी पोचल्यामुळे घराची आग आटोक्यात आणून संभाव्य नुकसान कळले आहे.

महाड शहरातील कातारी मोहल्ला परिसरात रविवार सकाळी सुमारे ९:४५ वाजण्याच्या सुमारास परिसरातील रहिवासी समीर पठाण यांच्या घराला अचानक आग लागल्याची घटना घडली. घरामध्ये मोठ्या प्रमाणात साहित्य साठवलेले असल्यामुळे आगीने अल्पावधीतच भीषण स्वरूप धारण केले आणि परिसरात एकच घबराट पसरली.



घटनेची माहिती मिळताच स्थानिक नगरसेवक वजीर कोंडीवकर यांनी तातडीने महाड नगर परिषद अग्निशमन दलाशी संपर्क साधला. अग्निशमन दलाचे पथक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी काही वेळातच आगीवर नियंत्रण मिळविले. घटनेची माहिती मिळताच पोलीस देखील घटनास्थळी दाखल झाले होते.

कातारी मोहल्ला हा दाट वस्तीचा भाग असल्यामुळे आग शेजारील घरांपर्यंत पसरण्याचा धोका निर्माण झाला होता, मात्र अग्निशमन दल वेळेत पोहचल्यामुळे मोठा अनर्थ टळला.

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसली तरी घरातील साहित्याचे मोठे नुकसान झाले आहे. आग लागण्याचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही.

# ना. आठवले आज घेणार राज्यसभा सदस्यत्वाची शपथ

**मुंबई : प्रतिनिधी**

रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना. रामदास आठवले यांची तिसऱ्यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झालेली आहे. ६ एप्रिल २०२६ रोजी संसदेत केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले आपल्या तिसऱ्या टर्मच्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेणार आहेत.

महाराष्ट्रातुन राज्यसभेवर सात खासदार बिनविरोध निवडुन गेलेले आहेत. त्यात ना. रामदास आठवले यांचा समावेश आहे. राज्यसभेवर सलग तिसऱ्यांदा बिनविरोध निवड होवून ना. रामदास आठवले यांनी राज्यसभा खासदार म्हणून हॅट्रीक केलेली आहे. आपल्या राज्यसभेच्या तिसऱ्या टर्मची सुरुवात ना. रामदास आठवले ६ एप्रिल २०२६ पासुन करणार आहे.

ना. रामदास आठवले यांची एप्रिल २०१४ला सर्वप्रथम राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. त्यानंतर एप्रिल २०२० मध्ये दुसऱ्यांदा राज्यसभेवर बिनविरोध निवड झाली. एप्रिल २०२० ते २ एप्रिल २०२६ पर्यंत त्यांच्या दुसऱ्या टर्मची मुदत होती. ६ एप्रिल २०२६ रोजी संसदेत ना. रामदास आठवले आपल्या राज्यसभा सदस्यत्वाची शपथ घेतल्यानंतर ६ एप्रिल २०२६ पासुन राज्यसभेच्या त्यांच्या तिसऱ्या टर्मला सुरुवात होणार आहे.

# रोहा साठलेवाडी ग्रामस्थांचा शिवसेनेत प्रवेश

**नागोठणे : बातमीदार**

रोहा तालुक्यातील विरझोली ग्रामपंचायत हद्दीतील साठलेवाडी गावातील ग्रामस्थांनी रविवारी आमदार महेंद्र दळवी यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर प्रवेश करत राजकीय वर्तुळात खळबळ उडवली आहे.



साठलेवाडी ग्रामस्थांनी आमदार महेंद्र दळवी यांच्या विकासाभिमुख नेतृत्वावर विश्वास ठेऊन तसेच घोसाळे विभागातील शिवसेनेचे युवा नेते मनोहर गोरे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत जाहीर प्रवेश केला असून सर्व प्रवेशकर्त्यांचे आमदार महेंद्रशेठ दळवी यांनी स्वागत करून पक्षात आपल्याला मानसन्मानाची वागणूक देऊन आपल्या गावातील विविध समस्या सोडविण्यासाठी कटीबद्ध असल्याची ग्वाही दिली.

या प्रवेश सोहळ्यावेळी आमदार महेंद्र दळवी यांच्या सह जिल्हा परिषद सदस्य आप्पा गोंधळी, वावे पोटगे येथील जेष्ठ कार्यकर्ते मोतीराम गिजे, मनोहर पाटील, विरझोलीचे माजी सरपंच शरद बुधर, अशोक बुधर, दिनेश गोरिवले, माजी उपसरपंच प्रकाश गोरीवले, विरझोली ग्रामपंचायत सदस्य मधुकर भुवड, अनिल हरेकरे, विनायक हरेकरे, सामाजिक कार्यकर्ते नारायण पवार, युवा कार्यकर्ते जयंत पाटील, प्रदीप आग्री यांच्यासह गावातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

नुकत्याच पार पडलेल्या पंचायत समिती निवडणुकीत मनोहर गोरे यांचा निसटता पराभव झाला, मात्र पराभवाने खचून न जाता त्यांनी दमदार आमदार महेंद्र दळवी यांच्या सहकार्यातून घोसाळे विभागात विकासाचा झंजावात कायम सुरू ठेवला आहे. युवा नेते मनोहर गोरे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या प्रवेश सोहळ्यात साठलेवाडी ग्रामस्थांनी एकमुखाने शिवसेनेत प्रवेश केल्याचे सांगण्यात आले.

"गावाच्या सर्वांगीण विकासासाठी आणि प्रलंबित कामे मार्गी लावण्यासाठी आम्ही हा निर्णय घेतला," अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. या घडामोडीमुळे स्थानिक राजकारणात मोठा बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# सेवानिवृत्त संघटनेच्या सभेत विविध विषयांवर चर्चा

**तळा : प्रतिनिधी**

तळा तालुका सेवानिवृत्त संघटनेची सभा नुकतीच विविध विषयांवरती चर्चा होऊन संघटनेचे अध्यक्ष अनंत वारे यांचे अध्यक्षतेखाली पार पडली आहे .



यावेळी संघटनेचे पदाधिकारी व सभासद भानू मंचेकर,दिपक ठाकूर, मारोती शिर्के, सुनिता पाटील, पद्मा गाडगीळ, जनार्दन वडके, नामदेव भौड, आदी उपस्थित होते. यावेळी प्रथम अ.ल.लोखंडे विद्यामंदिर पिटसईच्या संस्थेवर सचिव सदस्यपदी निवड झालेल्या गोविंद ठाकर, लक्ष्मण मनवल व कृष्णा पंदेरे यांचा सत्कार करण्यात आला तर विशेष असा सघटनेच्या माध्यमातून उपक्रमांतर्गत हसनमिया परदेशी, कल्पना गायकवाड, नामदेव किर्तने यांचा वाढदिवस साजरा करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या आहेत.

यावेळी भानू मंचेकर, मारूती शिर्के, कमळाकर चोरगे, अनंत वारे यांनी आपल्या मनोगतातून शुभेच्छा दिल्या.व संघटनेच्या माध्यमातून अडीअडचणी सर्वोतोपरी सोडविण्यात येतील व कोणतेही काम मागे राहणार नाही असे अध्यक्षांनी सूचित केले आहे.

# जगातून कम्युनिस्ट अन् देशातून काँग्रेस हद्दपार होतेय -ना. अमित शाह

**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केरळमधील कुन्नाथुनाडू येथे आयोजित सभेतून राज्यातील तरुणांना राज्यातच रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देत एनडीए सरकारला संधी देण्याचे आवाहन केले. यावेळी शाहांनी केरळमधील सुशिक्षित तरुणांना नोकऱ्या नसल्याचा मुद्दा उपस्थित केला आणि एनडीए सरकार आल्यास रोजगारनिर्मिती करून तरुणांना गल्फ देशात जाण्यापासून रोखू, असे आश्वासन दिले.

अमित शाह म्हणाले की, भारतात सर्वात आधी साक्षर राज्य म्हणून केरळम ओळखले गेले. येथील तरुण शिक्षित आणि बुद्धिमान आहेत, पण त्यांच्याकडे रोजगार नाही. आम्हाला असे केरळम घडवायचे आहे, जिथे तरुणांना राज्यातच रोजगार मिळेल आणि नोकरीसाठी गल्फ देशात जावे लागणार नाही.

शाहांनी कम्युनिस्ट आणि काँग्रेस पक्षावर टीका करत सांगितले की, कम्युनिस्ट पक्ष जगभरातून संपत चालला आहे, तर काँग्रेस देशातून संपत आहे. देश आज पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली वेगाने प्रगती करत आहे. २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत केरळममध्ये एनडीए ला १४% मते मिळाली होती, आता राज्यात एनडीए सरकार स्थापन करण्याची वेळ आली आहे.

शाह पुढे म्हणाले की, खरा विकास हवा असेल, तर नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकार निवडणे आवश्यक आहे.

# मुरूड, अलिबाग येथील एसटी समस्या निवारण करण्याची मागणी ; विभाग नियंत्रकांची भेट



**मुरूड : प्रतिनिधी**

सध्या मुरूड व अलिबाग तालुक्यात एसटी बस समस्येमुळे असंख्य प्रवासी वर्ग त्रस्त आहे. वेळेत गाड्या न सुटणे, गाड्यांची संख्या कमी करणे, गरज असलेल्या ठिकाणी गाडी उपलब्ध नसणे, अश्या अनेक समस्या सुटाव्यात व प्रवासी वर्गाला दिलासा मिळावा यासाठी मनसेचे प्रमुख पदाधिकारी यांनी रामवाडी येथे रायगड विभागाचे विभाग नियंत्रक चौरे साहेब यांची कार्यालयात भेट घेऊन या समस्या लवकर न्याय देण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे. प्रवासी वर्गाच्या भेडसावणाऱ्या लवकरात लवकर निवारण होण्यासाठी यावेळी मनसे उपजिल्हाध्यक्ष शैलेश खोत, रस्ते आस्थापना तालुका संघटक अमित कंटक, मुरूड तालुका सचिव राजेश तरे आणि निवृत्त एसटी कर्मचारी कणगी यावेळी उपस्थित होते.

यावेळी मुरुड आगारातील बंद असलेली रात्री १० ची मुंबई मुरुड रातराणी गाडी गेले कित्येक दिवस आहे.ती तात्काळ सुरू करावी . याबाबत चौरे साहेबांनी ही गाडी लवकरच सुरू करणार असल्याचे सांगितले. रात्री ८ नंतर पनवेल हून अलिबाग साठी प्रवासी संखे नुसार एसटी बस सोडण्यात याव्यात तसेच एक एक तासानी गाडी सोडली जावी जेणे करून प्रवासी वर्गाला मोठा दिलासा मिळेल. अशी मागणी यावेळी करण्यात आली.

# कळंबोलीतील एटीएममध्ये कचऱ्याचे साम्राज्य

**कळंबोली : बातमीदार**

कळंबोली वसाहती मधील सेंट जोसेफ विद्यालयाच्या समोर गोकुळ सोसायटीच्या गाळ्यामध्ये असलेले बँक ऑफ इंडियाचे एटीएम सेंटर हे रामभरोसे असल्यासारखे दिसून येत आहेत. या ठिकाणी सुरक्षारक्षक साईनाथ करण्यात आलेला नसल्याने तो गायब आहे. अनेक महिन्यांपासून साफसफाई न केल्याने कचऱ्याचे प्रचंड इथे साम्राज्य पसरले आहे. बसवण्यात आलेले दोन्ही वातानुकूलित यंत्र बंद अवस्थेत असून दरवाज्याची काचही तुटलेली आहे. त्यामुळे भविष्यात कोणता आर्थिक बाबतीत घातपात घडल्यास त्याला जबाबदार कोणाला धरायचे याबाबत बँक ऑफ इंडियाचे ग्राहकांनी संताप



## एसी बंद, काच तुटलेली, सुरक्षा रक्षकही गायब!

व्यक्त केला आहे.

कळंबोली वसाहतीमध्ये सेक्टर ४ च्या गोकुळ सोसायटीच्या आवारात असलेल्या अत्यंत कायम रहदारीची वर्दळ असलेल्या ठिकाणी राष्ट्रीय कृत बँक असलेल्या बँक ऑफ इंडियाचे एटीएम सेंटर आहे.या एटीएम सेंटरमध्ये दोन एटीएम ची मशीन कार्यान्वित केलेली आहेत. या मशीनमधून लाखो रुपयांचा व्यवहार हा दररोज केला जात असल्याचे एकंदरीत दिसून येत आहे. या सेंटरचे सर्व यंत्रणा या कुचकामी आणि निकामी असल्याचे ग्राहकांना निदर्शनास आले आहे. एटीएम सेंटरची साफसफाई ही गेले अनेक महिन्यांपासून केलेली दिसून येत नाही. त्यामुळे पैसे काढल्यानंतर निघणाऱ्या स्लिपा तसेच पैसे भरल्यानंतर त्याचे असलेली लेबल, वेस्टर्न, रबर त्या ठिकाणी टाकून ठेवल्याने एकंदरीत तशाच पडून अवस्थेत आहे. त्यामुळे एटीएम सेंटर आहे का कचऱ्याचे सेंटर आहे असा संभ्रम आता नागरिकांना निर्माण झाला आहे.

या सेंटरमध्ये दोन वातानुकूलित यंत्र बसवण्यात आलेली आहेत, परंतु ही दोन्ही यंत्र बंद अवस्थेत आढळून आली आहेत. एटीएम सेंटरचा काचेचा दरवाजा हा तुटलेल्या स्थितीत आहे. त्यामुळे आओ जा ओ तुम्हारा घर अशीच अवस्था येथे दिसून येत आहे. यामध्ये अनेक वेळा मोकाट फिरणारी कुत्रीही जाऊन बसताना ग्राहकांच्या दृष्टीस येतात.

या सेंटरमधून मोठ्या प्रमाणावर आर्थिक व्यवहार केले जातात तरीही येथे कोणतीही सुरक्षा यंत्रणा बँक ऑफ इंडियाच्या प्रशासनाने तैनात केलेली दिसून येत नाही. त्यामुळे भविष्यात जर या ठिकाणी कोणता घातपात घडल्यास त्याला कोणाला जबाबदार धरायचे असा यक्ष प्रश्न बँक ऑफ इंडियाचे ग्राहक व्यक्त करीत आहेत.

# स्पाच्या नावाखाली वेश्या व्यवसाय; पोलिसांचा छापा

## पीडित महिलेची सुटका; दाम्पत्याला अटक

**पनवेल : वार्ताहर**

बॉडी मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय चालवणाऱ्या कळंबोलीतील एका स्पा सेंटरवर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने छापा टाकून पती-पत्नीला अटक केली आहे. तसेच एका पीडित महिलेची येथून सुटका केली आहे.



कळंबोली, सेक्टर-१६ मधील निलकंठ धाम इमारतीतील गोल्डन किंग सलून आणि स्पा येथे मसाज पार्लरच्या आडून वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्या आधारे अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाचे व.पो.नि. पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली गोल्डन किंग सलून आणि स्पामध्ये ३ एप्रिल रोजी दुपारी बनावट ग्राहक पाठवून खात्री करण्यात आली. त्यानंतर पोलिसांनी या ठिकाणी छापा मारला. या कारवाई पोलिसांनी बनावट ग्राहकाकडून स्वीकारलेल्या ५०० रुपयांच्या नोटा, तीन महागडे मोबाईल जप्त केले.

दरम्यान, पोलिसांनी केलेल्या चौकशीत समीर ऊर्फ अलीगोर अब्दुलहफिज अन्सारी (वय ३३) व त्याची पत्नी परी ऊर्फ सलमा अलीगोर अन्सारी (वय २६) हे पती-पत्नी पीडित महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेत असल्याचे तसेच त्यातून मिळणाऱ्या पैशांवर स्वतःची उपजीविका भागवत असल्याचे निष्पन्न झाले.त्यानुसार अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने समीर परी या दोघांविरोधात कळंबोली पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये कळंबोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून दोघांना अटक केली आहे.

# मोठे भोम येथील सिंह गर्जला रणी नाट्यप्रयोगाला उदंड प्रतिसाद

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**

उरण तालुक्यातील मोठे भोम येथील श्री हनुमान नाट्य मंडळाच्या वतीने सिंह गर्जला रणी या मदन राजवाडेकर लिखित ऐतिहासिक नाट्य प्रयोगाचे शनिवारी रात्री उत्कृष्ट असे सादरीकरण करण्यात आले. या नाट्य प्रयोगाला रसिक प्रेक्षकांचा उदंड असा प्रतिसाद लाभला. त्यामुळे या नाट्यप्रयोगाची विशेष चर्चा उरण तालुका परिसरातील गावागावात ऐकवयास मिळत आहे.

या नाट्यप्रयोगाचे उद्घाटन जासई जिल्हा परिषद गटातील सदस्य डॉ. मनिष पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीसह विविध क्षेत्रातील स्थानिक मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. ज्येष्ठ दिग्दर्शक वसंत चिर्लेकर यांच्या प्रमुख मार्गदर्शनाखाली, दिग्दर्शक विजय केणी, सहदिग्दर्शक सुनील पाटील व चंद्रशेखर पाटील यांनी या नाट्यप्रयोगाची स्थानिक कलाकारांकडून योग्य अशी तयारी करण्यात होती.

अंगावर शहारे आणणारे नाटकातील ऐतिहासिक प्रसंग, लढाईच्या कसरती व ऐतिहासिक संवाद फेकीमुळे कलाकारांनी रंगमंचावर जणू शिवकाळ उभा



केल्याचे पाहायला मिळाले. दिग्दर्शकांचे कसब आणि कसलेल्या कलाकारांचा उस्फुर्त अभिनय यामुळे या ऐतिहासिक नाटक कलाकृतीला जिवंतपणा आला होता.या नाटकाची निर्मिती व व्यवस्थापन ग्रामस्थ मंडळ मोठेभोम यांची होती. तर सहनिर्मिती घनश्याम पाटील, समीर नारंगीकर, किशोर केणी, नवनीत नारंगीकर, दिलीप पाटील, बबन पाटील, सुनील पाटील, श्याम नामदेव पाटील, अनिल जोशी यांची होती. सूत्रधार रोहण पाटील, सदानंद पाटील होते.मोठेभोम प्राथमिक शाळेसह साहिल केणी, राजेश पाटील, शरद केणी, निलेश ठाकूर, दत्तात्रेय म्हात्रे यांचे नाट्यप्रयोगास विशेष सहकार्य लाभले.

नाट्य प्रयोगात बबन पाटील, अनंत पाटील, संग्राम ठाकूर, विजय केणी, चंद्रशेखर पाटील, सुनील पाटील, ज्ञानेश्वर पाटील, अभिजीत पाटील, अशितोष ठाकूर, सर्वेश पाटील, निलेश पाटील, अर्चना पाटील, श्रावणी म्हात्रे, राजेश पाटील, रितेश पाटील, साई ठाकूर, उदय पाटील, अतुल पाटील, संगम नारंगीकर, साई पाटील, कमलाकर पाटील, विवेक पाटील, साहिल केणी, दवेश नारंगीकर आदी कलाकारांनी प्रसंगात जिवंतपणा राखून, आपली अभिनय क्षमता सिद्ध केली. ध्वनी ध्रुवराज म्हात्रे, प्रकाश योजना राजेंद्र जोशी, नेपथ्य चंद्रशेखर पाटील, भगवान पाटील, रंगभूषा नंदकुमार चिरनेरकर, वेशभूषा चंद्रशेखर पाटील, संगीत व पार्श्वगायन गणेश घरत, तबला चैतन्य कडू, पार्श्वसंगीत उमेश गावंड, जनरेटर व्यवस्था स्मित पॉवर सर्विसेस मोठेभोम, व्हिडिओग्राफी मनोहर फुंडेकर, मनोहर ठाकूर या सर्व तंत्रज्ञानी नाटकातील प्रसंग फुलविले होते.

# जीएसटी सुलभीकरणावर बीसीटी लॉ कॉलेजमध्ये सेमिनार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खांदा कॉलनीमधील भागुबाई चांगू ठाकूर (बीसीटी) विधी महाविद्यालयाने डायरेक्टोरेट जनरल ऑफ टॅक्सपेयर सर्व्हिसेस (DGTS), मुंबई झोनल युनिट यांच्या सहकार्याने "जीएसटीचे सुलभीकरण आणि करदात्यांच्या तक्रार निवारण यंत्रणा" या विषयावर यशस्वीरीत्या सेमिनार-कम-वेबिनार आयोजित केला.

या कार्यक्रमात ऑफलाईन आणि ऑनलाईन अशा दोन्ही माध्यमांतून २००हून अधिक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. बीसीटी लॉ कॉलेजच्या विद्यार्थ्यांसह चांगू काना ठाकूर आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेजचे विद्यार्थीही मोठ्या संख्येने उपस्थित होते, ज्यामुळे कार्यक्रम अधिक वैविध्यपूर्ण आणि संवादात्मक ठरला.

हा सत्र सकाळी ११ वाजता सुरू झाले आणि अधिकाधिक विद्यार्थ्यांना सहभागी होता यावे यासाठी हायब्रिड पद्धतीने आयोजित करण्यात आले. सेमिनारचे मार्गदर्शन श्री. दीपक माता, उपआयुक्त, सीजीएसटी, मुंबई यांनी केले. त्यांनी जीएसटी कायद्यांचे सखोल ज्ञान आणि त्याचे व्यवहार्य परिणाम विद्यार्थ्यांना समजावून सांगितले.

सेमिनारमध्ये जीएसटीच्या विविध महत्त्वाच्या पैलूंवर प्रकाश टाकण्यात आला. सुरुवातीला जीएसटीची घटनात्मक पायाभूत रचना समजावून सांगण्यात आली. वयांनी कलम ३६६(१२अ) अंतर्गत जीएसटीची व्याख्या स्पष्ट केली आणि जीएसटी अंतर्गत कर लावण्याची घटना "पुरवठा" (Supply) असल्याचे अधोरेखित केले. विक्री, हस्तांतरण, वस्तुविनिमय, देवाणघेवाण आणि व्यवसायाच्या संदर्भात दिल्या जाणाऱ्या सेवांचा पुरवठा याबद्दल विद्यार्थ्यांना माहिती देण्यात आली.

भारतामधील जीएसटीचा प्रवासही उलगडण्यात आला. २००६ मधील घोषणेपासून ते १ जुलै २०१७ रोजीच्या अंमलबजावणीपर्यंतचा इतिहास सांगण्यात आला. "वन नेशन, वन टॅक्स", सहकारी संघराज्य व्यवस्था आणि एकसंध करप्रणाली या संकल्पनांवर विशेष भर देण्यात आला. तसेच पेट्रोलियम पदार्थ आणि मानवी उपभोगासाठी असलेले मद्य यांसारख्या जीएसटीच्या



कक्षेबाहेरील वस्तूंबाबतही माहिती देण्यात आली.

पुरवठा साखळी आणि आयजीएसटी मॉडेलचे सविस्तर स्पष्टीकरण देऊन आंतरराज्य आणि राज्यांतर्गत व्यवहारांमध्ये कर कसा आकारला जातो हे विद्यार्थ्यांना समजावले. कलम २७९अ अंतर्गत जीएसटी परिषदेची रचना, अधिकार आणि कर दर व धोरण निश्चितीतील तिची भूमिका स्पष्ट करण्यात आली. याशिवाय इनपुट टॅक्स क्रेडिट (ITC), रिव्हर्स चार्ज मेकॅनिझम, इनवर्ड सप्लाय आणि जीएसटी अंतर्गत कर आकारणी या महत्त्वाच्या बाबींचेही स्पष्टीकरण देण्यात आले.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरावरही भर देण्यात आला. अकाउंट ॲग्रिगेटर (AA) नेटवर्क आणि जीएसटीआर-१ चा क्रेडिट व कर्ज सुलभ करण्यासाठी होणारा उपयोग याबद्दल माहिती देण्यात आली. या सत्रातील एक महत्त्वाचा भाग म्हणजे करदात्यांच्या तक्रार निवारण यंत्रणेवरील चर्चा. जीएसटी पोर्टल, हेल्पडेस्क आणि अपील यंत्रणा यांसारख्या विविध माध्यमांद्वारे तक्रारी कशा सोडवल्या जातात हे विद्यार्थ्यांना समजावण्यात आले. प्रशासकीय आणि कायदेशीर उपाययोजनांचे महत्त्व सोप्या भाषेत स्पष्ट करण्यात आले.

सेमिनारचा शेवट प्रश्नोत्तर सत्राने झाला. विद्यार्थ्यांनी "वन नेशन, वन टॅक्स", आयकर रिटर्न भरणे, तसेच आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयात-निर्यात करप्रणाली यांसारख्या विषयांवर प्रश्न विचारले. या चर्चेमुळे विद्यार्थ्यांच्या शंका दूर झाल्या आणि जीएसटीचे व्यवहार्य ज्ञान अधिक दृढ झाले.

हा सेमिनार विधी विद्यार्थ्यांसाठी तसेच चार्टर्ड अकाउंटंट होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरला. कर कायदे, अनुपालन यंत्रणा आणि वाद निवारण प्रणाली यांविषयी मौल्यवान माहिती मिळाल्यामुळे विद्यार्थ्यांना भविष्यातील कायदेशीर व्यवसाय आणि कर क्षेत्रातील करिअरसाठी तयारी करण्यास मदत झाली.

महाविद्यालय सुमित कुमार, प्रधान अतिरिक्त महासंचालक (Pr. ADG), DGTS, मुंबई झोनल युनिट यांचे मार्गदर्शन व सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार मानते. तसेच जे.बी.एस.पी. संस्थेचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन व दूरदृष्टीबद्दल विशेष आभार व्यक्त करण्यात येतात. महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या नेतृत्वाबद्दल तसेच दीपक माता, उपआयुक्त, सीजीएसटी, मुंबई यांच्या ज्ञानवर्धक मार्गदर्शनाबद्दल संस्थेच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्यात येते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या रवनिश बेक्टर (Ravnish Bector) तसेच तांत्रिक सहाय्य पुरविणाऱ्या ऐश्वर्या पाटोळे यांचेही मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात येतात.

# खारघरच्या शिवमाला पाटीलचे वाईमध्ये सुरेल गायन

**कळंबोली : बातमीदार**

वाई सातारा येथे वीर शहीद मानसिंग नारायण निकम व्यासपीठावर आयोजित क्रीडा व सांस्कृतिक महोत्सवात नवी मुंबई खारघर कोपरा येथील ख्यातनाम गायिका सौ. शिवमाला पाटील यांनी आपल्या प्रभावी आणि सुरेल गायनाने संपूर्ण वातावरण भक्तिमय करून टाकले. त्यांच्या सादरीकरणाने रसिकांना अक्षरशः मंत्रमुग्ध केले असून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाची सुरुवात वारकरी संप्रदायातील पवित्र बीजमंत्र "जय जय राम कृष्ण हरी" या गजराने झाली. या मंगल सुरुवातीनंतर "सुंदर ते ध्यान", "हरिनामाचा गजर", "या रे



नाचू", "खेळे कान्हा" यांसारख्या अभंगांच्या सादरीकरणातून शिवमाला पाटील यांनी भक्तिरसाची अविरत बरसात केली. त्यांच्या आवाजातील माधुर्य, भावपूर्ण सादरीकरण आणि भक्तीभावामुळे संपूर्ण परिसरात आध्यात्मिक उर्जा संचारल्याचे चित्र पाहायला मिळाले. या भक्तिमय कार्यक्रमात सहगायिका म्हणून दिव्या भोईर, दिशा भोईर व कार्तिकी ठाकूर यांनीही उत्तम साथ देत सादरीकरण अधिक रंगतदार केले.

तबला व पखवाजवर निलेश पाटील आणि मिलिंद कडू यांनी लयबद्ध साथ देत कार्यक्रमाची उंची वाढवली, तर टाळ वादनासाठी अरुण भगत (खारघर) व प्रभाकर ठाकूर यांनीही प्रभावी साथ दिली. सर्व कलाकारांच्या समन्वयातून साकारलेला हा कार्यक्रम रसिकांसाठी अविस्मरणीय ठरला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जयवंत निकम सर यांनी ओघवत्या आणि प्रभावी शैलीत पार पाडले. या भक्तिरसाने नटलेल्या सादरीकरणामुळे महोत्सवाला एक वेगळाच आध्यात्मिक आयाम लाभला असून उपस्थितांनी या कार्यक्रमाचे जोरदार कौतुक केले.

# पनवेलमधील ज्येष्ठ नागरिकाला आठ दिवसांत १.५४ कोटींचा गंडा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील ६२ वर्षीय ज्येष्ठ नागरिकाला 'डिजिटल अरेस्ट' करत सायबर फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. दिल्ली एटीएसचे अधिकारी असल्याचे भासवून सायबर गुन्हेगारांनी आठ दिवस व्हिडिओ कॉलवर ठेवत तब्बल १.५४ कोटी रुपये उकळल्याचा प्रकार उघड झाला आहे. नवी मुंबई सायबर पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, २३ मार्च रोजी आंतरराष्ट्रीय क्रमांकावरून व्हॉट्सअॅप व्हिडिओ कॉलद्वारे संबंधित व्यक्तीशी संपर्क साधण्यात आला. स्वतःला दिल्ली एटीएस मुख्यालयातील अधिकारी असल्याचे सांगत आरोपींनी, पीडिताच्या नावावर असलेला सिमकार्ड दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणात आणि २.७५ कोटी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहारात वापरल्याचा खोटा दावा केला.

यानंतर आरोपींनी पीडिताला 'डिजिटल अरेस्ट' असल्याचे सांगत सतत व्हिडिओ कॉलवर राहण्यास भाग पाडले. तपास सुरू असल्याचे भासवत २४ तास संपर्कात राहण्यास सांगण्यात आले. भीती वाढवण्यासाठी आरोपींनी बनावट अटक वॉरंट आणि आरबीआयच्या शियासह खोटे



दस्तऐवजही पाठवले, ज्यामुळे संपूर्ण प्रकार अधिक विश्वासार्ह वाटावा असा प्रयत्न करण्यात आला.

'तपासासाठी पडताळणी'च्या बहाण्याने आरोपींनी पीडिताला विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडले. तपास पूर्ण झाल्यानंतर पैसे परत मिळतील, असे सांगत विश्वास संपादन करण्यात आला. कायद्याच्या कारवाईच्या भीतीने पीडिताने २३ ते ३१ मार्चदरम्यान एकूण १.५४ कोटी रुपये ट्रान्सफर केले. त्यानंतर आरोपींनी पनवेल पोलीस ठाण्यात कागदपत्रे घ्यायला सांगितले. मात्र तेथे गेल्यावर कोणतेही प्रकरण नसल्याचे समजताच फसवणूक झाल्याचे उघड झाले.

पीडिताच्या तक्रारीवरून पोलिसांनी भारतीय न्याय संहितेच्या कलम ३१८(४), ३१९(२), ३३८, ३४०(२), ३५१(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या कलम ६६(डी) अंतर्गत गुन्हा नोंदवला आहे. पोलीस निरीक्षक विशाल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तपास सुरू आहे.

## पोलिसांचे नागरिकांना आवाहन

***कोणतीही सरकारी संस्था किंवा पोलीस व्हिडिओ कॉलद्वारे अटक करत नाहीत किंवा पडताळणीसाठी पैसे मागत नाहीत, असे स्पष्ट करत पोलिसांनी नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. संशयास्पद कॉल आल्यास तत्काळ जवळच्या पोलीस ठाण्यात संपर्क साधावा किंवा १९३० या सायबर हेल्पलाइनवर तक्रार नोंदवावी, असेही सांगण्यात आले आहे.***

# चैत्र महिन्यात पनवेल परिसरातील गावोगावी यात्रा, पालख्यांना प्रारंभ

**पनवेल : वार्ताहर**

दरवर्षीप्रमाणे यंदाही चैत्र महिन्यात पनवेल परिसरातील गावोगावी यात्रा, पालख्यांना सुरुवात झाल्याने गावागावांमध्ये धार्मिकतेचे वातावरण आहे.

दरवर्षी दूरवर असलेल्या प्रियजनांना एकत्र आणून नात्यांची वीण घट्ट करणाऱ्या गाव यात्रांना नुकतीच सुरुवात झाली. चैत्र महिन्यात दरवर्षी गावातील गाव देव-देवीच्या जत्रा आणि यात्रांना सुरुवात होते. याची तयारी पनवेल तालुक्यातील विविध गावांत सुरू झाली आहे. पनवेल परिसरातील अनेक गावातील देवींच्या यात्रा या प्रसिद्ध आहेत. या यात्रांमध्ये सहभागी होण्यासाठी गावाबाहेर नोकरी व्यवसायासाठी गेलेले ग्रामस्थ मोठ्या उत्साहाने हजेरी लावतात. या यात्रांमध्ये



गावातील हौशी कलाकार नाटक सादर करतात.

यावेळी शासन काठी नाचविण्याचीही प्रथा अनेक गावांत आहे. त्यासाठी ग्रामस्थ महिनाभर मेहनत घेतात. या यात्रांमध्ये मांसाहारी मेजवानी असते. तसेच दोन दोन दिवस चालणारे पालखी उत्सवही असतात. आजच्या आधुनिक काळातही पनवेल परिसरात शेकडो वर्षांची जत्रा आणि यात्रांची परंपरा कायम आहे. दोन ते तीन दिवस रंगणाऱ्या या यात्रेत पालखी सोहळा पाहण्यासाठी भाविकांची गर्दी उसळते. पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात येते. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी-कधी ३६ ते ४८ तासांहूनही अधिक कालावधी लागतो. त्यामुळे या यात्रेला भाविकांची प्रचंड गर्दी जमते.

# संतोष आमले यांचा पुरस्काराने सन्मान

**पनवेल : वार्ताहर**

आष्टी तालुक्यातील अंभोरा येथील सुपुत्र व नवी मुंबई पनवेल येथून दैनिक युवक आधारच्या माध्यमातून पत्रकारिता क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणारे संतोष शिवदास आमले यांना World Cultural and Educational Organisation तर्फे 'Honorary Doctorate Award' या मानाच्या पुरस्काराने गौरविण्यात आले आहे.

ही संस्था भारत सरकार मान्यताप्राप्त असून, संस्थेच्या मूल्यांकन मंडळाने संचालक व अध्यक्ष यांच्या अधिकाराने हा सन्मान जाहीर केला आहे. पत्रकारिता क्षेत्रातील त्यांचे निष्ठावान, धडाडीचे व समाजाभिमुख कार्य लक्षात घेऊन हा सन्मान प्रदान करण्यात आला आहे. आमले यांनी आपल्या पत्रकारितेच्या माध्यमातून अनेक सामाजिक प्रश्नांना वाचा फोडत सामान्य जनतेच्या अडचणी प्रशासनापर्यंत पोहोचवण्याचे काम सातत्याने केले आहे. त्यांच्या लेखणीने समाजप्रबोधन घडवून आणत जनजागृतीची महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे.

या सन्मानामुळे अंभोरा गावासह आष्टी तालुक्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विविध क्षेत्रातील मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. संतोष आमले यांच्या या यशामुळे ग्रामीण भागातील तरुणांना प्रेरणा मिळत असून, जिद्द, चिकाटी आणि प्रामाणिक मेहनतीच्या जोरावर कोणतेही उद्दिष्ट साध्य करता येते.



## संपादकीय

# भाजप : देशप्रेमी विचारप्रवाह

भारतीय राजकारणात महत्त्वपूर्ण स्थान निर्माण करणाऱ्या भारतीय जनता पक्षाचा स्थापना दिन दरवर्षी ६ एप्रिल रोजी मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. १९८० साली स्थापन झालेल्या या पक्षाने अल्पावधीतच देशातील प्रमुख राजकीय शक्ती म्हणून आपली ओळख निर्माण केली. आज भाजप हा भारतातील सर्वात मोठा आणि प्रभावी राजकीय पक्ष मानला जातो.

**भाजपचा इतिहास समजून घेण्यासाठी त्याच्या मुळाशी असलेल्या भारतीय जनसंघ या पक्षाचा उल्लेख करणे आवश्यक आहे. १९५१मध्ये डॉ. श्यामा प्रसाद मुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. देशात राष्ट्रवादी विचारधारा बळकट करण्यासाठी आणि भारतीय संस्कृतीला केंद्रस्थानी ठेवून राजकारण करण्यासाठी हा पक्ष निर्माण झाला होता. जनसंघाने आपल्या सुरुवातीच्या काळात अनेक आव्हानांचा सामना केला, परंतु त्याने आपली विचारसरणी कायम ठेवत जनतेमध्ये हळूहळू विश्वास निर्माण केला. १९७५मध्ये देशात लागू झालेल्या आणीबाणीच्या काळात अनेक विरोधी पक्षांनी एकत्र येत जाचक व्यवस्थेला विरोध केला. त्यातून १९७७मध्ये जनता पक्षाची स्थापना झाली आणि जनसंघाने त्यात विलीन होण्याचा निर्णय घेतला. जनता पक्षाने निवडणुकीत विजय मिळवून केंद्रात सत्ता स्थापन केली. पुढे ६ एप्रिल १९८० रोजी भारतीय जनता पक्षाची अधिकृत स्थापना करण्यात आली. भाजपने आपल्या धोरणांमध्ये काळानुसार बदल करत जनतेच्या अपेक्षांनुसार स्वतःला विकसित केले. भाजपच्या उभारणीत अनेक नेत्यांचे योगदान अनन्यसाधारण आहे. अटलबिहारी वाजपेयी हे पक्षाचे पहिले पंतप्रधान होते. त्यांच्या नेतृत्वाखाली १९९८ ते २००४ या कालावधीत देशात स्थिर सरकार कार्यरत होते. त्यांनी विकास, संवाद आणि समन्वय या तत्त्वांवर भर देत देशाच्या प्रगतीसाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतले. त्याचबरोबर लालकृष्ण अडवाणी यांनी संघटन वाढवण्यासाठी आणि पक्षाचा विस्तार करण्यासाठी मोठे योगदान दिले. २०१४मध्ये नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने ऐतिहासिक विजय मिळवला. या निवडणुकीत भाजपने बहुमतासह केंद्रात सत्ता स्थापन केली. २०१९ आणि पुढे २०२४मध्ये पुन्हा एकदा जनतेने भाजपवर विश्वास दाखवून त्यांना अधिक मोठा जनादेश दिला. पंतप्रधान मोदींच्या नेतृत्वाखालील सरकारने 'सबका साथ, सबका विकास' या मंत्रावर आधारित अनेक योजना राबवल्या. जनधन योजना, स्वच्छ भारत अभियान, उज्ज्वला योजना, आयुष्मान भारत यांसारख्या उपक्रमांमुळे देशातील विविध घटकांना लाभ मिळाला. भाजप स्थापना दिन हा पक्षासाठी केवळ औपचारिक कार्यक्रम नसून कार्यकर्त्यांसाठी प्रेरणेचा दिवस आहे. या दिवशी देशभरात विविध कार्यक्रम आयोजित केले जातात. पक्षाचे कार्यकर्ते घराघरात जाऊन जनतेशी संवाद साधतात, पक्षाच्या विचारधारेची माहिती देतात आणि समाजसेवेचे उपक्रम राबवतात. रक्तदान शिबिरे, स्वच्छता मोहीम, वृक्षारोपण यांसारख्या उपक्रमांद्वारे समाजाशी नाते अधिक दृढ केले जाते. भाजपच्या यशामागे मजबूत संघटनशक्ती हा एक महत्त्वाचा घटक आहे. देशाच्या प्रत्येक कोपऱ्यात कार्यरत असलेले लाखो कार्यकर्ते पक्षाच्या विचारसरणीला जनतेपर्यंत पोहचवतात तसेच पक्षाचे नेतृत्व वेळोवेळी बदलत्या परिस्थितीनुसार योग्य निर्णय घेत राहिले आहे. त्यामुळेच भाजपने ग्रामीण भागापासून शहरी भागापर्यंत आपली मजबूत पकड निर्माण केली आहे. अनेक आव्हानांना सामोरे जात भाजपने आपली वाटचाल कायम ठेवली आहे. आजच्या घडीला भाजप हा केवळ एक राजकीय पक्ष नसून एक व्यापक विचारप्रवाह बनला आहे. देशाच्या विकासासाठी आणि जागतिक पातळीवर भारताची ओळख मजबूत करण्यासाठी पक्ष प्रयत्नशील आहे.**

# अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी साधना सप्ताह

भारत सरकार, क्षमता विकास आयोग (CBC) आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने २ ते ८ एप्रिल या कालावधीत साधना सप्ताह आयोजित करण्यात आला आहे. देशातील शासकीय विभागात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना अधिक कार्यक्षम बनविणे, भविष्यातील आव्हानांसाठी तयार करणे आणि तंत्रज्ञानाची सवय आपल्या कामकाजात करुन त्यांना सक्षम करणे हा या सप्ताहाचा मुख्य उद्देश आहे.

केंद्र शासनाने साधना सप्ताह उपक्रम राबविण्याच्या सूचना सर्व राज्यांना दिल्यानंतर आता राज्यातही महा-साधना सप्ताह २ ते ८ एप्रिल या काळात आयोजित करण्यात आला आहे. टेक लर्निंग वीक अंतर्गत आठ लाख ८० हजारांहून अधिकारी आणि कर्मचारी सात दिवसांत किमान चार तासांचे अभ्यासक्रम iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन पूर्ण करणार आहेत. यामुळे जवळपास ३५ लाखांहून अधिक वेळ अधिकारी आणि कर्मचारी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर वेगवेगळे अभ्यासक्रम शिकतील. यामध्ये राज्यातील ३६ जिल्हे, ३२ विभाग, आणि सहा विभागीय कार्यालये यामध्ये विविध शासकीय कार्यालयात काम करणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी महासाधना सप्ताहात सहभाग नोंदविणे गरजेचे असेल.

अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी साधना सप्ताह हा iGOT कर्मयोगी भारत अंतर्गत राबविला जाणारा एक विशेष प्रशिक्षण कार्यक्रम आहे. हा उपक्रम मिशन कर्मयोगीचा एक भाग असून शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या कौशल्यवृध्दीसाठी आणि तंत्रज्ञानदृष्टया सक्षम करण्यासाठी आयोजित केला जातो. एक आठवडाभर आयोजित केला जाणारा हा उपक्रम पूर्णपणे ऑनलाईन प्रशिक्षण कार्यक्रम आहे. यामध्ये शासनाच्या विविध विभागांतील काम करणारे अधिकारी आणि कर्मचारी आपल्या स्वतःच्या कामाशी संबंधित नवीन कौशल्ये, तंत्रज्ञान आणि कार्यालयीन कामकाज सुकर होण्याच्या पध्दती शिकतात. शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कार्यक्षमता वाढविणे, डिजिटल गव्हर्नन्स आणि नवतंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, सतत शिक्षण घेत राहणे, वेळ व्यवस्थापन ही सप्ताह आयोजित करण्यामागची मुख्य उद्दिष्टे असल्याने या सप्ताहात प्रत्येकाने स्वयंस्फूर्तीने सहभागी व्हावे असे आवाहन सामान्य प्रशासन विभागाच्या अपर मुख्य सचिव व्ही. राधा यांनी राज्यातील सर्व अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना केले आहे.

महा-साधना सप्ताहाचे वैशिष्ट्य म्हणजे iGOT Karmayogi Appद्वारे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आपल्या वेळेनुसार प्रशिक्षण घेता येईल. अधिकारी आणि कर्मचारी आपले काम सांभाळून हे अभ्यासक्रम पूर्ण करणार असल्याने कामकाजावर परिणाम न होता अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची कौशल्यवृध्दी होण्यास मदत होईल. या अभ्यासक्रमांमुळे प्रत्येकाला स्वतःची क्षमता ओळखून त्यानुसार कौशल्ये विकसित करण्याची संधी मिळते.

**महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत**

बदलत्या काळाशी सुसंगत राहण्यासाठी शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी नवीन कौशल्ये आत्मसात करणे गरजेचे आहे. आजच्या शासकीय कामकाजात सुद्धा विविध डिजिटल प्रणाली, ॲप्सचा वापर होत आहे. महा-साधना सप्ताहामुळे प्रशासनात डिजिटल सक्षमता वाढविण्यास मदत होणार आहे. नवीन तंत्रज्ञानाचा शासकीय कामकाजात वापर, नागरिक केंद्रित सेवा आणि पारदर्शकता वाढविण्यास या सप्ताहाची मदत होणार आहे.

या सप्ताहाच्या अनुषंगाने राज्यातील विविध शासकीय कार्यालये. जिल्हा कार्यालये यामध्ये कार्यरत अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी iGOT कर्मयोगी भारत पोर्टलवर लॉग इन करुन त्यांना नेमून दिलेले अभ्यासक्रम या काळात पूर्ण करणे गरजेचे राहील. पूर्ण केलेल्या अभ्यासक्रमाचा एकूण कालावधी किमान चार तास असणे अनिवार्य आहे. सर्व अभ्यासक्रम २ ते ८ एप्रिल दरम्यान पूर्ण करणे गरजेचे असून कर्मयोगी भारत पोर्टलवर सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांनी नोंदणी आणि अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे आहे. मंत्रालयीन प्रशासकीय विभागाचे सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिव (या विभागाच्या अधिनस्त सर्व क्षेत्रीय कार्यालये) तसेच विभागीय आयुक्त (विभागीय आयुक्त कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये आणि विभागांतर्गत येणाऱ्या जिल्हापरिषदा) या सर्वांनी साधना सप्ताहात एकूण ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करणे गरजेचे राहील. विशेष म्हणजे साधना सप्ताह कार्यक्रमात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या (iGOT) पोर्टलवरील आकडेवारीच्या आधारे विभागांना महाराष्ट्रात मे महिन्यात होणाऱ्या 'TECH-वारी २.०'मध्ये प्रशस्तीपत्रक देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.

**-वर्षा फडके आंधळे,** उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

# भारतीय शैलीदार क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर

भारताचे माजी क्रिकेटपटू दिलीप वेंगसरकर यांचा आज वाढदिवस. कपिल देव यांच्या भारतीय संघाने जेव्हा विश्वचषक जिंकला, त्या संघात दिलीप वेंगसरकर आहेत.

दिलीप वेंगसरकर यांचा जन्म ६ एप्रिल रोजी १९५६ महाराष्ट्रातील राजापूर येथे झाला. वेंगसरकर यांनी १९७५मध्ये नागपूर येथे झालेल्या इराणी ट्रॉफी सामन्यात तत्कालीन बॉम्बे संघाकडून खेळताना ११० धावांची शानदार खेळी केली होती. 'कर्नल' नावाने प्रसिद्ध असलेल्या वेंगसरकरांनी संपूर्ण कारकीर्दीत ११६ कसोटी खेळल्या. यामध्ये त्यांनी १७ शतके आणि ३५ अर्धशतकांसह ६,८६८ धावा केल्या. वनडेमध्ये त्यांनी १२९ एकदिवसीय सामन्यात ३,५०८ धावा ठोकल्या.

१९८७मध्ये जेव्हा रँकिंग सिस्टिम सुरू झाली, तेव्हा जगातील पहिला नंबर १ बॅट्समन होण्याचा विक्रम वेंगसरकरांच्या नावावर आहे. १९८७मध्ये ते जगातील नंबर १ कसोटीपटू म्हणून पहिल्या क्रमांकाच स्थान मिळवलं. वेंगसरकरांनी ६४.४६पेक्षा जास्त सरासरीने धावा केल्या.

१९७५मध्ये इराणी करंडक स्पर्धेत शेष भारताविरुद्ध मुंबईकडून शतक झळकावल्यानंतर खऱ्या अर्थाने वेंगसरकरांच्या कारकिर्दीला सुरुवात झाली. १९७५-७६मध्ये ऑकलंडमध्ये न्यूझीलंडविरुद्ध सलामीवीर म्हणून त्यांनी पदार्पण केले.

१९८३ च्या विश्वचषक विजेत्या भारतीय संघाचे सदस्य असलेले वेंगसरकर यांनी ११६ कसोटी सामन्यांत ६,८६८ धावा आणि १७ शतके झळकावली. क्रिकेटची पंढरी समजल्या जाणाऱ्या लॉर्ड्स मैदानावर त्यांनी तीन शतके ठोकली.



वेंगसरकरांनी माल्कम मार्शल, मायकेल होल्डिंग आणि अँडी रॉबर्ट्स यांच्यासारख्या वेस्ट इंडिजच्या वेगवान आक्रमणावर वर्चस्व गाजवलं. त्यांनी त्याकाळी अत्यंत आक्रमक असलेल्या वेस्ट इंडिज संघाविरुद्ध तब्बल सहा शतके झळकावली.

१९८७च्या विश्वचषकानंतर वेंगसरकरांनी कपिल देव यांच्याकडून भारतीय संघाचे कर्णधारपद स्वीकारले, परंतु बीसीसीआयसोबतच्या वादामुळे १९८९मध्ये त्यांना संघाबाहेर ठेवण्यात आले. एका वर्षानंतर ते राष्ट्रीय संघात परतले.

वेंगसरकर १९९२मध्ये क्रिकेटमधून निवृत्त झाले. त्यानंतर त्यांनी मुंबईत स्वतःची क्रिकेट अकादमी सुरु केली. २००६मध्ये त्यांची बीसीसीआयने मुख्य निवडकर्ता म्हणून नियुक्ती केली. भारताला दोन वेळा विश्वचषक जिंकून देणाऱ्या महेंद्रसिंह धोनीची निवड वेंगसरकारांच्याच कारकिर्दीत झाली.

वेंगसरकरांची १९८३च्या विश्वचषकातील भूमिका सर्वांना माहिती आहे. भारताच्या पहिल्या विश्वविजयावर '८३' नावाचा सिनेमादेखील प्रदर्शित झाला आहे. या चित्रपटात दिलीप वेंगसरकर यांची भूमिका अभिनेता आदिनाथ कोठारेने साकारली होती. (साभार : इंटरनेट)

## बदलते तंत्रज्ञान

### आता हवा तसा बदलता येणार जीमेल आयडी

तुम्ही सुरुवातीच्या काळात गडबडीत किंवा नकळतपणे तयार केलेल्या जीमेल आयडीमुळे आज ऑफिसमध्ये किंवा प्रोफेशनली संकोच वाटतो का? जर हो, तर




तुमच्यासाठी एक आनंदाची बातमी आहे. गुगलने आता जीमेलच्या इतिहासातला सर्वात मोठा बदल करत, वापरकर्त्यांना त्यांचे जी-मेल युजरनेम बदलण्याची सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली आहे. गेल्या २२ वर्षांपासून जीमेल वापरकर्ते ज्या फीचरची आतुरतेने वाट पाहत होते, ते अखेर प्रत्यक्षात आले आहे.

आतापर्यंत जर कोणाला आपले ईमेल आयडीचे नाव बदलायचे असेल, तर त्यांना जुने अकाउंट बंद करून नवीन अकाउंट उघडावे लागत असे. यामुळे जुन्या ई-मेल्स आणि महत्त्वाच्या फाइल्स गहाळ होण्याची भीती असायची, मात्र आता गुगलने ही अडचण दूर केली आहे. तुम्ही तुमच्या जुन्याच अकाउंटमध्ये राहून '@' चिन्हाच्या आधीचा भाग, म्हणजेच तुमचे युजरनेम बदलू शकणार आहात.

**प्रोफेशनल लूकसाठी उत्तम संधी**

अनेकदा आपण कॉलेज लाइफमध्ये किंवा सुरुवातीला मजेशीर नावाने ईमेल आयडी तयार करतो, जो नंतर व्यावसायिक कामांसाठी वापरताना अवघडल्यासारखे होते. या नवीन अपडेटमुळे आता युजर्सना आपली डिजिटल ओळख अधिक प्रोफेशनल आणि सुटसुटीत करता येणार आहे. हे फीचर केवळ युजरनेम बदलण्यासाठीच नाही, तर ऑनलाइन ओळख अधिक प्रभावी करण्यासाठी एक मोठे पाऊल मानले जात आहे.

**भारतात कधी मिळणार सुविधा?**

गुगलने सध्या या फीचरची सुरुवात अमेरिकेतील युजर्ससाठी केली आहे. कंपनीच्या ब्लॉग पोस्टनुसार टप्प्याटप्प्याने हे फीचर जगभरात रोलआउट केले जात आहे. लवकरच हे फीचर आशिया आणि युरोपसह भारतामध्येही उपलब्ध होणार आहे. भारतीय युजर्सना यासाठी फारशी वाट पाहावी लागणार नाही, असे संकेत कंपनीने दिले आहेत. या अपडेटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे, तुमचे जुने ई-मेल आयडीदेखील सक्रिय राहणार आहेत. त्यामुळे महत्त्वाचे मेल गहाळ होण्याची किंवा कोणाशी संपर्क तुटण्याची भीती उरणार नाही.


# कवी, कथाकार हणमंत जोशी उर्फ सुधांशु

हणमंत नरहर जोशी अर्थात 'काव्यतीर्थ' कवी सुधांशु हे नामवंत कवी होते. त्यांचा जन्म ६ एप्रिल १९१७ रोजी सांगली जिल्ह्यातील औदुंबर गावी झाला. त्यांनी अनेक मराठी भावगीते लिहिली आहेत. मराठी कवी कुंजविहारी यांनी ह.न. जोश्यांना सुधांशु हे नाव दिले आणि पुढे त्याच नावाने ते ओळखले जाऊ लागले.

सुधांशु यांचे शिक्षण एसएससीपर्यंत झाले. १९३७पासून त्यांनी काव्यलेखनास प्रारंभ केला. त्यांच्या कविता किर्लोस्कर, स्त्री, मनोहर आदी मासिकांतून प्रसिद्ध होत होत्या. या कवितांचे पुढे पुस्तकरूपाने संग्रह झाले. सुधांशूंना एकदा रा.अ. कुंभोजकर यांनी 'तुम्ही कवी कसे झालात?' असे विचारले. त्यावर ते म्हणाले, 'मी दोन मातांच्यामुळे कवी झालो.

एक माझी जन्मदात्री माऊली आणि दुसरी कृष्णामाई. एकीने माझ्या अंतःकरणात कवितेची बीजे रुजवली आणि दुसरीने आपल्या निर्मलतेने आणि समृद्धीने मला काव्यदृष्टी दिली. 'सुधांशूंच्या गीतदत्तात्रयाचे कार्यक्रम श्रीक्षेत्र औदुंबर येथे पहिल्यांदा, नंतर मिरजेच्या अण्णाबुवा मठात आणि नंतर इतर अनेक ठिकाणी झाले.

खडकातले झरे (१९५१) हा त्यांचा एकमेव कथासंग्रह आणि काही बालकथा, संतचरित्रे सोडता त्यांनी गद्यलेखन केले




**निमित्त**

नाही. कवी म्हणूनच ते प्रसिद्धीस पावले. भावगीते आणि भक्तिगीते त्यांनी लिहिली. भक्तिगीते ही त्यांनी मुख्यतः दत्तोपासनेसाठी लिहिली आहेत. दत्तगीते (१९५८), गीत दत्तात्रेय (१९६५), दत्तगुरुंची गाणी सुंदर (१९७९) हे त्यांच्या दत्तगीतांचे संग्रह होत. साधा पण रसाळ आविष्कार हे त्यांच्या दत्तगीतांचे वैशिष्ट्य होय. प्रथितयश गायकांनी गायिलेल्या त्यांच्या दत्तगीतांच्या ध्वनिमुद्रिकांना श्रोत्यांचा मोठा प्रतिसाद लाभला. भरली चंद्रभागा (१९६६) हा त्यांचा अभंगसंग्रहही उल्लेखनीय आहे. त्यांच्या अन्य गीतसंग्रहांत कौमुदी (१९४०), गीतसुगंध (१९६०), गीतसुवर्ण (१९६१), गीतसुधा (१९६३), गीतसुषमा (१९६४), कालिंदीकाठी (१९६५ गौळणीसंग्रह) ह्यांचा समावेश होतो.

कवी सुधांशु यांनी आयुष्यभर खादीचे कपडे घातले. त्यांच्या अंगावर सतत एक शाल असे. सुधांशूंनी भारताच्या १९४२ सालच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेतला होता. आपल्या स्वातंत्र्यगीतांतून आणि पोवाड्यांतून त्यांनी स्वातंत्रसैनिकांना स्फूर्ती दिली. त्यांच्या घरी काही भूमिगत स्वातंत्र्यसैनिक एकदोन दिवसांसाठी गुप्तपणे मुक्कामासाठी राहून जात. गावकऱ्यांच्या कवी सुधांशूंवर असलेल्या अतूट प्रेमामुळे ही बातमी पोलिसांपर्यंत कधीच पोहचली नाही. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर त्यांनी स्वतःला ग्रामसुधारणेला वाहून घेतले.

१९६०मध्ये ते अंकलखोप या गावचे सरपंच म्हणून बिनविरोध निवडून आले आणि १९६५पर्यंत त्या पदावर राहिले. त्याच सुमाराला गावाला स्वच्छतेचा आणि व्यसनमुक्तीचा पुरस्कारही मिळाला. कवी सुधांशूंना शंकराचार्यांकडून काव्यतीर्थ ही पदवी मिळाली. भारत सरकारकडून १९७४मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्कार, मराठी साहित्य परिषदेकडून कवी यशवंत पुरस्कार मिळाला तसेच वाराणसी विद्यापीठाने त्यांना 'डी.लिट्.' ही सन्मान्य पदवीही दिली. सदानंद साहित्य मंडळातर्फे औदुंबर येथे त्यांनी साहित्यसंमेलने भरवली. अशा या महान कवीचे १८ सप्टेंबर २००६ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट)

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### उन्हाळ्यात घामाची दुर्गंधी अशी दूर करा...

उन्हाळा वाढला की घाम येणे स्वाभाविक आहे. घाम येणे ही शरीराची नैसर्गिक प्रक्रिया असली, तरी त्यासोबत येणारी दुर्गंधी मात्र अनेकांसाठी त्रासदायक ठरते. विशेषतः गर्दीत, ऑफिसमध्ये किंवा प्रवासात असताना ही समस्या अधिक जाणवते, पण घामाला वास का येतो आणि तो कसा थांबवता येईल, हे समजून घेतले तर हा त्रास कमी करता येऊ शकतो.

प्रत्यक्षात घामाला वास नसतो. आपल्या त्वचेवर असलेल्या बॅक्टेरियांच्या संपर्कात घाम आला की दुर्गंधी निर्माण होते. शरीरातील अपोक्राइन ग्रंथी (विशेषतः बगल, मान, गुप्तांग भागात) जास्त सक्रिय झाल्या की त्या घामात प्रथिने आणि फॅटी ॲसिड्स सोडतात. हे घटक बॅक्टेरियांसाठी अन्नासारखे असतात आणि त्यातूनच वास निर्माण होतो. याशिवाय, खूप तिखट किंवा मसालेदार अन्न, लसूण-कांद्याचे जास्त सेवन, स्वच्छतेचा अभाव, ताणतणाव, हार्मोनल बदल किंवा काही वेळा आरोग्याच्या समस्या यांमुळेही घामाला जास्त वास येऊ शकतो.



या समस्येवर घरगुती उपाय खूप प्रभावी ठरू शकतात. सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे स्वच्छता. रोज अंघोळ करणे, विशेषतः घाम येणाऱ्या भागांची नीट स्वच्छता ठेवणे आवश्यक आहे. यासाठी साध्या पाण्यासोबत कधीम कोमट पाण्यात थोडा लिंबू किंवा मीठ घालून अंघोळ केल्यास त्वचेवरील बॅक्टेरिया कमी होण्यास मदत होते.

लिंबू हा नैसर्गिक अँटीबॅक्टेरियल घटक आहे. काखेत लिंबूरस लावल्यास दुर्गंधी कमी होते. तसेच बेकिंग सोडा देखील घामाचा वास कमी करण्यासाठी उपयोगी ठरतो. तो त्वचेवर न लावता कपडे धुताना वापरावा. तो ओलसरपणा कमी करतो आणि बॅक्टेरियांची वाढ थांबवतो. गुलाबपाणी किंवा चंदनाचा वापरही त्वचेला ताजेतवाने ठेवण्यासाठी केला जाऊ शकतो.

अंगावर घाम कमी यावा आणि वास येऊ नये यासाठी सैल, सूती कपडे घालणे खूप गरजेचे आहे. सिंथेटिक कपड्यांमुळे घाम अडकून राहतो आणि वास वाढतो. त्यामुळे शक्यतो कॉटन आणि सैलसर कापडांचा वापर करावा. पाणी जास्त प्रमाणात पिणेही महत्त्वाचे आहे. शरीरातील टॉक्सिन्स बाहेर पडण्यासाठी आणि घामाचा वास कमी करण्यासाठी हे मदत करते. आहाराकडेही लक्ष देणे आवश्यक आहे. तिखट, तेलकट आणि जास्त मसालेदार पदार्थ कमी खाल्ले तर घामाचा वास कमी होतो. त्याऐवजी फळे, भाज्या आणि हलका आहार घेतल्यास शरीर आतून स्वच्छ राहते. बडीशेप किंवा धणे पाणी यांसारखी पेयही शरीराला थंड ठेवतात आणि दुर्गंधी कमी करण्यास मदत करतात.

# सहाण-रोहा रस्ता, नवघर पुल रखडला

### कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याची मागणी



**रेवदंडा : प्रतिनिधी**

शिवसेनेचे अलिबाग तालुका प्रमुख, तसेच रायगड जिल्हा परिषदेतील शिवसेनेचे सदस्य अनंत गोंधळीं यांच्या पाठपुराव्यामुळे सहाण-रोहा रस्त्याच्या कामाला सुरवात झाली आहे, मात्र या कामाला ठेकेदाराकडून गतीच येत नसल्याने पावसाळ्यापूर्वी हे काम पूर्णत्वास न गेल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा गोंधळी यांनी संबंधित विभागाला दिला आहे.

अलिबाग-रोहा या रस्त्यादरम्यानचा काही दिवसांपूर्वी रात्रीच्या वेळी पूल पडल्याने या रस्त्यावरून येजा करणाऱ्यांची गैरसोय झाली होती. गोंधळी यांनी तातडीने संबंधित विभागाशी संपर्क साधत सदर पूल दोन दिवसात तयार करून घेतल्याने या रस्त्यावरून येजा करणाऱ्यांची गैरसोय दूर झाली. मात्र गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या सहाण-रोहे या दरम्यानच्या कामाला गतीच येत नव्हती. त्यामुळे गोंधळी यांनी सहाण ते रोहे दरम्यान रस्त्याच्या कामाला गती आणण्यासाठी संबंधित विभागाला पत्र दिले, तर कुरुळ ते अलिबाग या दरम्यानच्या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत कुरुळच्या ग्रामपंचायतीने पत्र देत संबंधित विभागाचे लक्ष वेधले होते.

सहाण ते रोहे या दरम्यानच्या रस्त्याचे काम ज्या ठेकादाराने हाती घेतले होते, त्याने या रस्त्यावरील जेथे अधिक दुरुस्तीची गरज होती, त्याकडे दुर्लक्ष करीत जेथे खर्च कमी येईल, तेथील रस्त्याची प्रथम दुरुस्तीचे काम हाती घेत कामाचे बिल घेतल्याचा आरोप होत आहे. उर्वरित रस्त्याच्या कामाकडे तीन वर्षे दुर्लक्ष झाल्याने याबाबत मिडियासह स्थानिकांनी आवाज उठवित शासनाचे याकडे लक्ष वेधले होते.

दरम्यान, गोंधळी यांनी अलिबागच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या निवेदनात अलिबाग-रोहा रस्त्याचे रा.मा.९१ कि.मी.०/०० ते ८५/६०० काम सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे मे.जे.आर.ए. अलिबाग रोड प्रोजेक्ट प्रा.लि. या कंपनीला देण्यात आल्याचे म्हटले आहे; परंतु अद्यापही या रस्त्याचे काम पूर्णत्वास न गेल्याने शिवसेना आमदार महेंद्र दळवी यांनी याबाबतचा मुद्दा विधानसभेत मांडला. सध्याच्या परिस्थितीत अलिबाग ते सहाण बायपास हा रस्ता एमएसआयडीसीकडे वर्ग करण्यात आलेला आहे; परंतू सहाण बायपासपासून पुढील काम हे मे.जे.आर.ए. अलिबाग रोड प्रोजेक्ट प्रा.लि. या कंपनीला करणे गरजेचे आहे.

अलिबाग-रोहा रस्त्यांना जोडणारा महत्त्वाचा नवघर या पुलाच्या कामाला ठेकेदाराने हातही लावलेला नाही. म्हणून अलिबाग-रोहा एसटी पावसाळ्यात पुन्हा एकदा बंद होऊ शकते आणि त्याला सर्वस्वी जबाबदार संबंधित विभाग असेल, असेही निवेदनात नमूद केले आहे.

## अंबा नदीपात्रात आढळला मृतदेह

**पेण : प्रतिनिधी**

वडखळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील कोलेटी येथील अंबा नदीपात्रात एका अनोळखी पुरुषाचा मृतदेह कुजलेल्या अवस्थेत आढळून आला होता.

हा मृतदेह पूर्णपणे कुजून हाडांचा सापळा झालेल्या व विखुरलेल्या स्थितीत २४ ऑगस्ट २०२५ रोजी पोलिसांना दिसून आला. मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नसल्याने या प्रकरणाची नोंद अकस्मात मृत्यू म्हणून करण्यात आली आहे. पोलीस निरीक्षक संतोष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली या घटनेचा तपास सुरू असून संबंधित मृत इसमाच्या नातेवाईकांचा शोध घेतला जात आहे. दरम्यान, या मृत व्यक्तीबाबत कोणाकडेही माहिती असल्यास वडखळ पोलीस ठाण्याचे सहायक फौजदार महेश ठाकूर यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.


### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकारांनी मौजे गौरकामत आदिवासीवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत आहे, या मिळकतींमधील अविभक्त हिश्याचे मालक पल्लवी प्रकाश देसाई यांचेकडुन आमचे अशिलांनी विकत घेणेचे ठरविले आहे.

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्रफळ एकक हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|
| ६/४/ब | ००-३०-०० हे.आर.पॉ. या एकूण क्षेत्रापैकी पल्लवी प्रकाश देसाई यांच्या अविभक्त हिश्याच्या मालकीचे ००-०४-५० हे.आर.पॉ. इतके क्षेत्राची मिळकत | ०-३६ |

सबब सदर वर वर्णन केलेली मिळकतींबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास, त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिध्द झाले पासून, ०७ दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पूराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकती ह्या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतींचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणा-या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०६ एप्रिल २०२६

सही/-
ॲड. स्वप्नील सदानंद पाटील
बी. ए.एल.एल.बी.
पत्ता - भालिवडी, पोस्ट - गौळवाडी,
ता. कर्जत, जि. रायगड - ४१०२०१
मो. नं. ८७७९९३३८७२


## अर्चना साळुंके यांना पुरस्कार

**पाली : प्रतिनिधी**



'आविष्कार सोशल अँड एज्युकेशन फाउंडेशन इंडिया' सोलापूर जिल्हा शाखा) यांच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गौरव समारंभात, सुधागड तालुक्यातील रा.जि.प.शाळा दहिगाव येथील शिक्षिका अर्चना गणेश साळुंके यांना प्रतिष्ठित 'राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार २०२६' देऊन सन्मानित करण्यात आले.

मानपत्र, सन्मानचिन्ह आणि पुष्पगुच्छ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अर्चना साळुंके यांनी शिक्षण क्षेत्रात केलेल्या नाविन्यपूर्ण प्रयोगांची तसेच विद्यार्थ्यांप्रती असलेली निष्ठा आणि सामाजिक कार्याची दखल घेऊन फाउंडेशनने त्यांची या पुरस्कारासाठी निवड केली. अर्चना साळुंके या प्रयोगाशी व नवोपक्रमशील शिक्षिका म्हणून ओळखल्या जातात.

यावेळी फाउंडेशनचे संस्थापक/राष्ट्रीय अध्यक्ष संजय पवार, सोलापूर जिल्हा सचिव ए. बी. शेख, जिल्हाध्यक्ष, जब्बार शिकलगार आणि महिला संघटक स्नेहल खंकाळ यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. साळुंके यांनी सांगितले की पुरस्कारामुळे भविष्यात अधिक जोमाने काम करण्याची प्रेरणा मिळाल्याचे त्यांनी व्यक्त केले. त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक आणि सामाजिक स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## संजीवनी पिंगळे यांना पुरस्कार



**खालापूर : प्रतिनिधी**

रायगड प्रेस क्लब यांच्या वतीने आदर्श महिला सामाजिक पुरस्कार. संजीवनी अनिल पिंगळे यांना बहाल करण्यात आला.

बिग बॉस फेम सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई, वृत्त निवेदिका न्यूज १८ सुवर्णा जोशी यांच्या हस्ते उभयतांचा सन्मान करण्यात आला. यावेळी खोपोलीचे नगराध्यक्ष कुलदीपक शेंडे, पोलीस निरीक्षक सचिन हिरे जि.प. सदस्य संतोष भाई बैलमारे व मान्यवर यांच्या हस्ते स्वीकारण्यात आला.

## मनसेच्या रायगड जिल्हा संपर्कपदी राजेश येरुणकर

**महाड : प्रतिनिधी**

मनसेच्या महानगरपालिका व विधानसभा क्षेत्राच्या रायगड जिल्हा संपर्क प्रमुखपदी महाड तालुक्याचे भूमिपुत्र राजेश येरुणकर यांची नियुक्ती मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी जाहीर केली आहे. व तसा नियुक्तीचे पत्र राज ठाकरे यांनी काल येरुणकर यांना दिले आहे. त्यांच्या या नियुक्तीबद्दल महाडमधून त्यांचे अभिनंदन होत आहे.

रायगड जिल्ह्यासाठी संदीप देशपांडे, राजेश येरुणकर व योगेश परुळेकर यांची रायगड जिल्ह्यातील महानगरपालिका व विधानसभा क्षेत्रासाठी संपर्कप्रमुख म्हणून निवड जाहीर करण्यात आली आहे. मुंबई ठाण्यानंतर रायगड जिल्ह्याची लोकसंख्या सर्वात अधिक आहे. त्यामुळे रायगडची जबाबदारी ही मनसेचे नेते संदीप देशपांडे व महाड तालुक्यातील विन्हरे गावचे भूमिपुत्र राजेश गंगाराम येरुणकर यांना सोपविण्यात आली आहे.


### जाहिर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळवीणेत येते की मौजे वारदोली, तहसील- पनवेल, जिल्हा रायगड, येथील खाली वर्णन करणेत आलेली शेतजमीन विद्यमान कब्जेदार श्रीमती अंजना जनार्दन भोईर व इतर यांचेकडून आमचे अशिलानी कायम खरेदी घेणेचा व्यवहार ठरविला आहे, महसूल दप्तरी असलेले सदर शेतजमीनीचे वर्णन खालिलप्रमाणेः-

**शेतजमीनीचे वर्णन**

मौजे वारदोली,तहसिलदार पनवेल जिल्हा रायगड येथील
मे. दुय्यम निबंधक पनवेल यांचे अधीकार क्षेत्रातील

| गट क्रमांक व उपविभाग | भोगवटादार वर्ग | क्षेत्र: लावणी लायक हे.आर.प्रती | क्षेत्र: पोटखराबा हे.आर.प्रती | क्षेत्र: एकुण क्षेत्र हे.आर.प्रती | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|---|
| १३२/१/ब | १ | ०-९५-७० | ०-३५-३० | १-३१-०० पैकी विक्रीदार यांच्या मालकीचे क्षेत्र ०-४४-१७ | १४.५६ |

वरील शेतजमीन / मिळकत या बाबत अन्य कोणाही व्यक्तीचा गहाण, दान, बक्षीस, साठेकरार, फरोक्त, पोटगी, वारसा वा तत्सम कोणतेही प्रकारचे दस्ताने कोणतेही प्रकारचा हक्क वा हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्या सहीत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन ७ दिवसाचे आत पोहचतील अश्या खाली सही करणार खरेदीदाराचे वकील यांचेकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवाव्यात. वरील मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे समजणेत येवुन सदर खरेदी व्यवहार विद्यमान मालक यांच्या बरोबर पूर्ण केला जाईल व मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची स्पष्ट नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल
दिनांक : ०५/०४/२०२६

सही/-
ॲड. स्वप्निल व्यं. जाधव
बी.ए., एल. एल. बी.

**कार्यालयीन पत्ता** – शॉप नं. १५४, पनवेल महानगरपालिका शॉपिंग कॉम्प्लेक्स, दत्त झेरॉक्सच्यावर, ता. पनवेल, जिल्हा रायगड ४१०२०६
संपर्क : ८८८८२७१७५९



### Hari Niwas CO-OP HOUSING SOCITY LTD.

REG NO.RGD/URN/HSG/TC/७४४/२००१-२००२ DY.१३/०४/२००१

**जाहीर टेंडर नोटीस**

नोंदणीक्र.: आरजीडी/यूआरएन/एचएसजी / (टीसी)/७४४/२००१-२००२ दि.१८/०४/२००१

पत्ताः हरी निवास सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या इमारतीच्या पुनर्विकासासाठी नामांकित, अनुभवी व आर्थिकदृष्ट्या सक्षम विकसकांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत.

**प्रकल्पाची माहिती**

Bulit-up Area statement is follows:-
Plot No.1, S.No. 108C/1& 108/1(2+3+4+5),
Village: Chanje

| | |
|---|---|
| Plot Area | = 831.600sq.mtrs. |
| F.S.I. Permissible | = 1.0 |
| Permissible Built-up Area | = 831.600sq.mtrs. |
| Proposed Built-up Area | =831.381sq.mtrs. |
| Balance Area | = 0.219sq.mtrs. |

**निविदा वेळापत्रकः**

* निविदा फॉर्म उपलब्ध ०६/०४/२०२६ ते २०/०४/२०२६ वेळ: सकाळी ११:०० ते सायं. ६:००
स्थळ: सोसायटी कार्यालय

* निविदा सादर करण्याची अंतिम तारीखः
२३/०४/२०२६ सायं. ६:०० वाजेपर्यंत सोसायटी कार्यालयात.

सोसायटीला कोणतीही किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता स्विकारण्याचा किंवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.

**आदेशानुसार व्यवस्थापन समिती,**
**हरी निवास सहकारी गृहनिर्माण संस्था**

चौकशीसाठी संपर्क :- अध्यक्षः ७५०६७७८५७९/
सेक्रेटरीः ९८२१११८६१७/ खजिनदार: ९००४७८७५०१



### जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही त्यांचे विद्यमान मालक **अनिता अनंत ठाकूर व इतर** यांनी आमच्या अशिलांना संमती दर्शवली आहे व आमच्या अशिलांच्या सांगण्यावरुन ही वर्तमानपत्र जाहीर नोटीस देत आहे.

**मिळकतीचे वर्णन : मौजे : पिरकोन (५५३३३९)**
**(PU-ID : 19362708377), तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| गट क्रमांक | भूधारणा पद्धत | क्षेत्र (हे.आर.चौ.मी.) | आकार रु. पै. |
|---|---|---|---|
| २२२/७ खाते क्रमांक : १९५ | १ | ०.३८.०० पो.ख. ०.०३.०० | ५.६९ |
| | | **एकुण ०.४१.००** | |
| **एकुण क्षेत्र ०.४१.०० गुंठे** | | | |

वर नमुद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा व्यक्तींच्या कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वारसाहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध असल्यास त्याच्या लेखी हरकती, त्यांच्या हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या पुरेशा कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमच्या पत्त्यावर प्रत्यक्ष येऊन अथवा रजिस्टर पोस्टाने कागदोपत्री पुराव्यासह आपल्या लेखी हरकती व आक्षेप दाखल करावेत अन्यथा मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकतीशी इतर कोणाचेही कोणतेही हक्क हितसंबंध नाहीत वा असल्यास ते त्यांनी सोडून दिलेले आहेत. व सदर मिळकत निर्वेध आहेत असे गृहीत धरुन आमचे आशिल सदर मिळकतीचे खरेदीखत व्यवहार पूर्ण करतील मग मागाहून मुदतीनंतर उपस्थित करण्यात आलेल्या कोणत्याही हरकती व आक्षेप आमच्या आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०५/०४/२०२६

सही/-
ॲड. निलेश बा. झंजाड
बी-१०४ सफायर सी.एच.एस., भूखंड क्रमांक ३३/३४, सेक्टर २२, कामोठे, तालुका-पनवेल, जिल्हा-रायगड - ४१०२०६
मो. क्र. ९९२०४७५८०१



### SAI SAVALI CO-OP.HOUSING SOCIETY LTD.

R.No.: NBOM/CIDCO/HSG(OH)/1609/JTR/2003-2004
Plot No. 22, Sector – 19, Kharghar, Navi Mumbai - 410210

**Tender Notice**

Date: 06.04.2026

Sai Savali CHS Ltd invites the bids for the following tenders from experienced bidders on or before 7pm on 13.04.2026.

| Tender No | Description/Task |
|---|---|
| SSCHSL/25-26/01 | Water proofing of terrace and parapet wall of both wings of Sai Savali CHS |
| SSCHSL/25-26/02 | Crack filling and painting of all external & internal common walls of Sai Savali CHS |
| SSCHSL/25-26/03 | Internal and external replastering and water proofing of both overhead tanks |
| SSCHSL/25-26/04 | Borewell and design and installation of its separate water distribution system |
| SSCHSL/25-26/05 | Replacement of existing non-operational fire extinguisher system on buy back basis. |
| SSCHSL/25-26/06 | Installation of solar power plant combined with roofing and rainwater harvesting. (Rainwater can be stored in the borewell water tank) |

Note: For other terms and conditions, measurement and understanding of actual scope of work, bidders shall visit the Society. Contact Details: Pratham (Society Manager): 8879272768, Hemant Pawaskar: 9867550062, Ajay Khare: 8087406737, Pradip Shirke: 9967214256, Dabholkar: 8879346638

sd/-
FOR, SAI SAVALI CHS LTD



### महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

ई निविदा सूचना क्रमांक ०१/२०२६-२०२७ (मुंबई)

म.औ.वि.महामंडळातर्फे खालील कामांकरीता ई निविदा सूचना मागविण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजित रक्कम रुपये |
|---|---|---|
| १ | रोहा औद्योगिक क्षेत्रातील सांडपाणी निःसारण योजनेची देखभाल व दुरूस्ती.. रोहा औद्योगिक क्षेत्रातील ६३० मि.मी. व्यासाच्या सांडपाणी निःसारण वाहिनीवर बटरफ्लाय व्हॉल्व्हची पुरवठा करून जोडणे. | ₹ ३२,२४,०५१.०० |
| २ | महाड औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती...पावसाळ्यापूर्वीची आणि पावसाळ्यानंतरची कामे... अतिरिक्त महाड औद्योगिक क्षेत्रात रस्त्याच्या कडेच्या गटाराची साफसफाई, सीडीची कामे, पावसासाठी कट तयार करणे आणि रस्त्याच्या कडेला असलेला कचरा काढणे. | ₹ १३,९६,१६८.०० |
| ३ | रोहा औद्योगिक क्षेत्रासाठीच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती... रोहा येथील ईएसआर परिसरात ईएसआर २००० व ईएसआर-१२०० साठी नवीन जिन्याचे बांधकाम करणे. | ₹ ३९,१३,१९५.०० |
| ४ | रोहा औद्योगिक क्षेत्राची देखभाल व दुरूस्ती.... गेस्ट हाऊसच्या भूखंडाच्या संरक्षणासाठी संरक्षक भिंतीचे बांधकाम करणे. | ₹ ३६,६५,२१५.०० |
| ५ | महाड औद्योगिक क्षेत्रातील पाणीपुरवठा योजनेची देखभाल व दुरूस्ती...... पोलादपूर येथील सावित्री धरणावर मनुष्यबळ आणि यंत्रसामग्री नेमून फाउंडेशन गॅलरी आणि जॅकवेलमधून कचरा साफ करणे. | ₹ ७,१५,७९६.०० |
| ६ | पोयनाड आणि नागोठाणे येथील जलशुद्धीकरण केंद्रातील प्रयोगशाळेचे परिचालन व देखरेखीची सेवा पुरविणे. | ₹ २५,९२,९६०.०० |
| ७ | रोहा औद्योगिक क्षेत्राच्या पाणीपुरवठा योजनेची देखभाल आणि दुरुस्ती..... शुद्ध पाण्याच्या व सांडपाणी निःसरण वाहिनीवर बसवलेल्या फुलबोर इलेक्ट्रोमॅग्नेटिक फ्लो मीटर्ससाठी दोन कॅलेंडर वर्षांच्या कालावधीकरिता वार्षिक तत्वावर देखभाल व दुरूस्ती करणे. | ₹ १८,९४,०६८.०० |
| ८ | पाताळगंगा येथील जुनी पाणीपुरवठा योजना देखभाल व दुरूस्ती.... एचएसआर येथील व्हॉल्व्ह प्रणालीचे बळकटीकरण करणे. | ₹ ३९,०२,४००.०० |
| ९ | पाताळगंगा औद्योगिक क्षेत्रातील रस्त्यांची देखभाल व दुरूस्ती...... सावणे गावाकडे जाणाऱ्या रस्त्यावरील मे.एचपीसीएल भूखंड, सामाईक सुविधा केंद्राच्या इमारतीच्या मागचा रस्ता, जुने व नवीन जलशुद्धिकरण केंद्र, एचएसआर, जॅकवेल या भागातील खड्डे भरणे. | ₹ २३,२६,६८२.०० |

उपरोक्त कामांबाबत निविदा प्रपत्र दिनांक ०७/०४/२०२६ ते दिनांक २१/०४/२०२६ पर्यंत https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असतील.

इच्छुकांनी वरील कामांबाबत दिनांक १०/०४/२०२६ पूर्वी त्यांचे प्रश्न वर नमुद संकेत स्थळावर नोंदवावेत. कंत्राटदारांच्या मुद्यांचे निराकरण /महामंडळाचा खुलासा दिनांक १६/०४/२०२६ पासून वर नमुद संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

# नवी मुंबईत फ्लेमिंगोंची प्रतीक्षा कायम

## इतर स्थलांतरित पक्ष्यांनी पाणथळ भाग गजबजला



**नवी मुंबई : बातमीदार**

'फ्लेमिंगो सिटी' म्हणून ओळख असलेल्या नवी मुंबईत दरवर्षी हिवाळा-उन्हाळ्याच्या हंगामात मोठ्या थव्यांनी दाखल होणाऱ्या फ्लेमिंगो पक्षांची अद्याप प्रतीक्षा कायम आहे.

नेरूळमधील टी.एस. चाणक्य परिसरातील पाणथळ भाग विविध स्थलांतरित पक्ष्यांच्या उपस्थितीने गजबजून गेला असून, फ्लेमिंगो नसतानाही जैवविविधतेचे समृद्ध चित्र पक्षीनिरीक्षक आणि छायाचित्रकारांना अनुभवता येत आहे.

मॅरिटाइम विद्यापीठाच्या मागील बाजूस असलेल्या या पाणथळ भागात २ व ३ एप्रिल रोजी स्थानिक पक्षीनिरीक्षक डॉ. अनिल कुर्हे यांनी सकाळच्या सत्रात निरीक्षण करताना सुमारे ५०० पक्ष्यांची नोंद केली.

या वेळी कॉर्मोरंट, पेंटेड स्टॉर्क, सँडपायपर, ब्लॅक-विंग्ड स्टिल्ट, कर्ल्यू, स्पूनबिल, आयबिस, प्लोव्हर, विविध प्रकारचे टर्न आणि सीगल यांसह अनेक पाणपक्षी व किनारी पक्षी मोठ्या संख्येने दिसून आले. याशिवाय बगळे, मुनिया व स्टार्लिंग यांसारखे पक्षीही या भागात आढळले. त्यामुळे पक्षीनिरीक्षक आणि छायाचित्रकारांसाठी हा परिसर आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

फ्लेमिंगोंची संख्या मात्र यंदा अत्यल्प असून, वेगवेगळ्या दिवशी केवळ १५ ते २० पक्षीच दिसून आल्याचे कुर्हे यांनी सांगितले. सामान्यतः नोव्हेंबर ते मे या कालावधीत हजारोंच्या संख्येने फ्लेमिंगो नवी मुंबईतील पाणथळ भागात वास्तव्य करतात. त्या तुलनेत यंदाची संख्या लक्षणीयरीत्या घटली आहे. यामुळे पक्षीनिरीक्षणासाठी येणाऱ्या निसर्गप्रेमींची गर्दी काही प्रमाणात घटल्याचेही स्थानिकांकडून सांगितले जाते.

दरम्यान, शहरात फ्लेमिंगोंच्या घातलेल्या संख्येमागे कच्छच्या रणातील परिस्थिती कारणीभूत असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. यंदा पावसाळा उशिरा संपल्याने तेथील पाण्याची पातळी दीर्घकाळ टिकून राहिली आणि फ्लेमिंगोंचे प्रमुख अन्न असलेल्या शेवाळाची मुबलक वाढ झाली. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर फ्लेमिंगो तेथेच थांबले असून, नवी मुंबईकडे त्यांचे स्थलांतर कमी झाल्याचे पक्षीप्रेमी आणि पर्यावरणवादी कार्यकर्ते सुनील अग्रवाल यांनी सांगितले.

तज्ज्ञांच्या मते, परिस्थिती अनुकूल झाल्यानंतर फ्लेमिंगो पुढील काही आठवड्यांत नवी मुंबईत दाखल होण्याची शक्यता आहे. तोपर्यंत, फ्लेमिंगो नसले तरी इतर विविध पक्ष्यांच्या उपस्थितीमुळे शहरातील पाणथळ भाग समृद्ध जैवविविधतेचे दर्शन घडवत असल्याचे चित्र आहे.

**कच्छमध्येच का थांबले फ्लेमिंगो?**

पक्षीप्रेमी व पर्यावरणवादी कार्यकर्ते सुनील अग्रवाल यांच्या मते गुजरातच्या कच्छच्या खाडीत पाण्याची पातळी अद्याप स्थिर असल्याने फ्लेमिंगो महाराष्ट्रात आलेले नसावेत. कच्छच्या खाडीत फ्लेमिंगोना प्रजननासाठी अनुकूल परिस्थिती असल्याने मोठ्या प्रमाणात हे पक्षी कच्छच्या खाडीत अधिवास करतात. हे पक्षी ऑक्टोबर ते मार्च या काळात तिथे वास्तव्यास असतात.

गेल्यावर्षी पाऊस चांगला पडल्याने त्याचा देखील फ्लेमिंगोच्या स्थलांतरावर परिणाम झाला असावा. गुजरातमध्ये फ्लेमिंगोसाठी सध्या पोषक वातावरण तयार झाले असल्याने फ्लेमिंगोंना महाराष्ट्रात येण्यास विलंब लागत असल्याचा अंदाज त्यांनी वर्तविला आहे, मात्र परिस्थिती सुधारल्यास ते लवकरच नवी मुंबईत दाखल होतील. मे च्या पूर्वार्धात फ्लेमिंगो नवी मुंबई आणि आसपासच्या परिसरात दाखल होण्याची शक्यता सुनील अग्रवाल यांनी व्यक्त केली आहे.

# मोहोपाड्यात सार्वजनिक रस्त्यांवर अतिक्रमण करणाऱ्यांना इशारा



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

मोहोपाडा बाजारपेठेत बेकायदेशीर अतिक्रमणाचा कहर शिगेला पोहचला असून सर्वसामान्य नागरिकांच्या सहनशीलतेचा अंत पाहायला मिळत आहे. रस्त्यांवरच दुकाने थाटून बसलेल्या व्यावसायिकांमुळे निर्माण झालेल्या भीषण वाहतूक कोंडीवर अखेर पोलिसांनी 'अॅक्शन मोड'मध्ये प्रवेश केला आहे.

मोहोपाडा-चांभार्ली मार्गावर अनेक दुकानदारांनी आपल्या दुकानाचा पसारा थेट रस्त्यावर मांडत सार्वजनिक जागेचा अक्षरशः बेकायदेशीर ताबा घेतला आहे. फळे, भाजीपाला, विविध साहित्य तसेच जाहिरातींचे फलक रस्त्यावर ठेवल्यामुळे वाहतुकीचा पूर्णपणे बोजवारा उडाला आहे. याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थी, कामगार आणि दैनंदिन प्रवाशांना बसत आहे.

दररोज वाढणारी कोंडी, नागरिकांचा त्रास आणि प्रशासनाकडे होणाऱ्या तक्रारींचा भडका उडाल्यानंतर रसायनी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अभिजित भुजबळ यांनी आता थेट मैदानात उतरून अतिक्रमणधारकांना अंतिम इशारा दिला आहे. विक्रेत्यांनी रस्त्याचा काही भागांवर ताबा दाखविण्यास सुरुवात केल्याने वाहतूक कोंडी होवून अपघाताची शक्यता निर्माण झाली आहे.हिच परिस्थिती मोहोपाडा बाजारपेठेत दिसून येते.

रस्त्यावरचा एकही इंच व्यापू नका, अन्यथा दंडात्मक आणि कठोर कायदेशीर कारवाईस तयार राहा!' असा सज्जड दम त्यांनी दुकानदारांना भरला आहे. यापुढे रस्त्यावर माल, स्टॉल किंवा फलक आढळल्यास कोणतीही सूट न देता थेट कारवाई करण्यात येणार असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. सार्वजनिक रस्त्यांवर 'दादागिरी' करणाऱ्यांविरोधात पोलिसांची ही आक्रमक भूमिका कितपत परिणामकारक ठरते, याकडे आता संपूर्ण परिसराचे लक्ष लागले आहे.

# न्यूईरा हॉस्पिटलचे डॉक्टर ठरले देवदूत!

**पनवेल : वार्ताहर**

पाम बीच रोडवर झालेल्या भीषण दुचाकी-चारचाकी अपघातात दोन तरुण गंभीर जखमी झाले होते. न्युईरा हॉस्पिटलच्या डॉक्टरांनी दाखविलेल्या तत्परतेमुळे आणि वेळेत मिळालेल्या उपचारांमुळे या अपघातग्रस्त रुग्णांचा प्राण वाचले.

या रुग्णांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून त्यांच्या प्रकृतीत लक्षणीय सुधारणा झाली आहे. नेरुळहून वाशीच्या दिशेने जात असताना न्यूईरा हॉस्पिटलच्या क्लिनिकल कोऑर्डिनेटर डॉ. स्नेहा थोरवे यांनी हा अपघात पाहिला. एका दुचाकी आणि चारचाकी वाहनाची जोरदार धडक होऊन दोघे रस्त्यावर जखमी अवस्थेत पडले होते. दोघांनाही गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्रावही झाला होता आणि त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक होती. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून डॉ. स्नेहा थोरवे यांनी क्षणाचाही विलंब न करता दोघांना रिक्षामधून तातडीने न्यूईरा हॉस्पिटलमध्ये दाखल केले. रुग्णालयात पोहचताच आपत्कालीन विभागाने तत्काळ उपचार सुरू केले.

सुरुवातीला ही स्थिती गंभीर होती, पण वेळीच उपचार मिळाल्याने दोघांची प्रकृती सुधारली. काही दिवसांच्या उपचारांनंतर आणि काळजीपूर्वक निरीक्षणानंतर दोघांनाही रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून पूर्णपणे बरे होईपर्यंत विश्रांती आणि नियमित फॉलोअपचा सल्ला देण्यात आला आहे.

# वाशीतील एचपी गॅस ग्राहक सहकारी संस्थेची सेवा अखंड ठेवण्याची मागणी

**नवी मुंबई : बातमीदार**

वाशी सेक्टर ५ येथील एचपी गॅस डीलर असलेल्या कन्झुमर सोसायटी लिमिटेडमार्फत सुरू असलेली गॅस सिलिंडर सेवा कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, तसेच ती अखंड आणि सुरळीत सुरू ठेवावी, अशी ठाम मागणी नवी मुंबई महानगरपालिकेचे उपमहापौर दशरथ भगत यांनी केली आहे.

याबाबत संस्थेच्या अध्यक्ष व सचिवांना दिलेल्या निवेदनात भगत यांनी नमूद केले आहे की, संबंधित संस्थेने अनेक वर्षांपासून नागरिकांना सातत्याने आणि सुलभ पद्धतीने गॅस सेवा पुरवली आहे. या सेवेमुळे वाशी गावठाण परिसरातील तसेच शहरी भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळत आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे जीवनावश्यक सेवांवर परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता, गॅस पुरवठा अधिक सक्षमपणे व आपत्कालीन स्वरूपात सुरू ठेवणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

निवेदनात त्यांनी संस्थेच्या संचालकांनी ग्राहक सहकारी संस्था अधिनियमाचे पालन करत जबाबदारीने निर्णय घ्यावेत, संचालक हे संस्थेचे विश्वस्त असल्याने ग्राहकहित जपणे आवश्यक असल्याचे अधोरेखित केले. गॅस सिलिंडर सेवा पूर्णपणे बंद होईपर्यंत पुरवठा अखंड ठेवावा, तसेच उर्वरित ग्राहकांना पाईपलाईन गॅस सुविधा उपलब्ध होईपर्यंत सिलिंडरद्वारे सेवा देणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

महाराष्ट्र नॅचरल गॅस लिमिटेड मार्फत काही भागात पाईपलाईन गॅस सेवा सुरू असली, तरी मूळ गावठाण भागात सुरक्षेच्या कारणास्तव सिलिंडरद्वारेच गॅस पुरवठा करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यामुळे संबंधित भूखंडाचा वापर गॅस सिलिंडर सेवा पुरवठ्यासाठीच अखंड ठेवावा, अशी मागणीही करण्यात आली आहे.

तसेच संस्था बंद करण्याचा कोणताही निर्णय घेण्यापूर्वी सर्व नोंदणीकृत ग्राहकांना लेखी नोटीस देणे, त्यांच्या हरकती जाणून घेणे आणि संस्थेचे नियम (बाय लॉज) तसेच सिडको भूखंड कराराची माहिती ग्राहकांना देणे बंधनकारक असल्याचे त्यांनी अधोरेखित केले.

राज्य शासनाने दिलेल्या भूखंडाचा वापर मूळ उद्देशाप्रमाणेच व्हावा, अन्यथा त्याचे उल्लंघन होऊ नये, यासाठी संचालकांनी खबरदारी घ्यावी, असेही भगत यांनी सांगितले. दरम्यान, गॅस सेवा अखंड सुरू ठेवण्यासाठी नागरिकांचे पूर्ण सहकार्य राहील, असे आश्वासनही त्यांनी दिले आहे.

# नर्मदा परिक्रमा केलेल्या दोघांचे होणार आगमन

## कोपरखैरणेतील मंदिरात कार्यक्रम

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

कोपरखैरणे गावातील कै.पांडुरंग वेटा यांचे नातु पखवान वादक ह.भ.प.कु.धनंजय रामेश्वर वेटा आणि कोपरी गावातील हभप विशाल पाटील या वारकऱ्यांनी २२ डिसेंबर रोजी श्री नर्मदा परिक्रमा हे प्रसिद्ध धार्मिक ठिकाण अनवाणी पायी जाण्याचा निर्णय घेतला. येत्या ११ एप्रिल रोजी सकाळी ९ वाजता दोघांचे कोपरखैरणे येथील श्री गणोबा (गणेश) मंदिरात आगमन होणार आहे

नवी मुंबई ते श्री नर्मदा अशी १०८ दिवसाची परिक्रमा केलेल्या दोघांचे स्वागत श्री हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ व विठ्ठल रखुमाई वारकरी सेवा मंडळ कोपरखैरणे करणार असून यावेळी टाळ व मृदुंगाच्या गजरात



'विठ्ठल विठ्ठल - हर हर नर्मदेच्या नाम घोषात दिंडी सोहळा मिरवणूक काढण्यात येणार आहे. इथ श्री हनुमान मंदिरात श्री नर्मदा मय्याचे पुजन, कन्या पुजन होणार असून त्या निमित्ताने नवी मुंबईतील पहिले श्री नर्मदा परिक्रमा करणारे किर्तनकार ह.भ.प. ज्ञानराज महाराज म्हात्रे (कोपरखैरणे) यांचे सुश्राव्य किर्तन ११ एप्रिल रोजी दुपारी होणार आहे. त्यानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले असल्याचे ग्रामस्थ अविनाश भरत पाटील यांनी सांगितले.

# बाबासाहेबांच्या विचारांतून घराघरात लोकशाही रूजेल -अॅड. वर्षा देशपांडे

## *नवी मुंबईत जागर २०२६ व्याख्यानमाला*

**नवी मुंबई : बातमीदार**

समानता ही आपोआप निर्माण होत नाही, तर ती विचारांतून आणि कृतीतून रुजवावी लागते. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार घराघरात पोहचले तरच खऱ्या अर्थाने लोकशाही समाजात रुजेल, असा ठाम विश्वास ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अॅड. वर्षा देशपांडे यांनी व्यक्त केला. स्त्रियांना समान मतदानाचा हक्क देण्यासह अनेक कायद्यांद्वारे बाबासाहेबांनी स्त्रीमुक्तीचा पाया रचला, असेही त्यांनी नमूद केले.

नवी मुंबई महानगरपालिकेतर्फे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ऐरोली सेक्टर १५ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात ३ ते १३ एप्रिलदरम्यान आयोजित 'जागर २०२६' व्याख्यानमालेच्या



उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. कार्यक्रमास महापौर सुजाता पाटील, स्थायी समिती सभापती अशोक पाटील, नगरसेविका ऐश्वर्या सोनावणे, उपआयुक्त संघरत्ना खिल्लारे, लेखक-उद्योजक प्रफुल्ल वानखेडे आदी उपस्थित होते.

स्त्री-पुरुष समानतेवर भाष्य करताना देशपांडे यांनी स्त्रीला देवी म्हणून पूजणे किंवा दासी म्हणून हिणवणे या दोन्ही टोकाच्या भूमिका चुकीच्या असल्याचे सांगितले. स्त्रीला माणूस म्हणून स्वीकारणे हीच खरी समानतेची सुरुवात असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. समाजातील स्त्रीच्या योगदानाची केवळ जाणीव ठेवून उपयोग नाही, तर ती प्रत्यक्ष व्यवहारात मान्य करून अंगीकारणे आवश्यक असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.


स्त्रीभ्रूणहत्या रोखण्यासाठीचा लढा, दारूबंदी चळवळ, तसेच महिलांच्या मालमत्तेवरील हक्कासाठी केलेले आंदोलन यांचे उदाहरण देत त्यांनी महिलांच्या नेतृत्वाची ताकद अधोरेखित केली. संसार हा दोन चाकांचा रथ असला, तरी निर्णयाचे नियंत्रण पुरुषांकडेच असल्याची वस्तुस्थिती बदलून समानतेवर आधारित नाते निर्माण होणे गरजेचे आहे, असे त्यांनी सांगितले.

आज महिला विविध क्षेत्रात आघाडीवर असून नोकरी, व्यवसाय आणि घर या तिन्ही आघाड्यांवर त्यांना मोठी कसरत करावी लागते. 'सुपर वूमन' होण्याच्या दबावातून बाहेर पडत आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचा सल्ला त्यांनी दिला. स्त्रिया प्रत्यक्षात लोकशाही अधिक प्रभावीपणे जगतात, कारण त्या सर्वांना सहभागी करून घेण्याची क्षमता ठेवतात, असेही त्यांनी नमूद केले. व्याख्यानाच्या शेवटी उपस्थितांनी लिंगभेद, जातभेद न करण्याची, हुंडा प्रथा टाळण्याची आणि मुलगा-मुलगी समान मानण्याची सामूहिक शपथ घेतली.

**महामानवाने दिलेल्या अधिकारांमुळेच महिलांना नेतृत्वाची संधी : महापौर**

महापौर सुजाता पाटील यांनी उद्घाटनप्रसंगी बाबासाहेबांना अभिवादन करत त्यांच्या विचारांनी समाजात परिवर्तन घडवून आणल्याचे सांगितले. संविधानातून मिळालेल्या अधिकारांमुळेच महिलांना महापौर, नगरसेविका यांसारख्या पदांवर काम करण्याची संधी मिळाल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत विविध योजना राबविण्यात येत असून 'लखपती दीदी' योजना तसेच एनएमएमटी बससेवेत महिलांना चालक म्हणून प्रशिक्षण व रोजगार देण्याचे उपक्रम सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

**क्लिक...क्लिक...!**



मुरूड : भालगाव रोहा रस्त्यावर खाडी असल्याने परिसर निसर्गरम्य आहे. कोळी बांधव शांत समुद्रात जाळी टाकून मासेमारी करताना टिपलेले चित्र. (छाया : सुधीर नाझरे)

# मिनी सी शोअर जुहूगाव चौपाटी येथे विशेष स्वच्छता मोहीम

**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ सर्वेक्षण २०२५ - २६च्या अनुषंगाने महापालिका आयुक्त कैलास शिंदे यांनी विशेष बैठक घेत घनकचरा व्यवस्थापन विभागासह पर्यावरण, सार्वजनिक आरोग्य अभियांत्रिकी, स्थापत्य, उद्यान अशा सर्वच विभागांना दृश्यात्मक स्वच्छतेकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश दिले होते.

या अनुषंगाने महापालिका क्षेत्रात कामाला सुरूवात झालेली असून घनकचरा व्यवस्थापन विभागाच्या वतीने अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार व उपआयुक्त डॉ.अजय गडदे यांच्या नियंत्रणाखाली वाशी सेक्टर १० येथील मिनी सी शोअर अर्थात जुहूगाव चौपाटी परिसर आणि प्राधान्याने तेथील धारण तलावाचा भाग स्वच्छता करण्यात आला.



दोन दिवसांपूर्वी या धारण तलाव भागात मोठ्या प्रमाणात मासे मृत्यूमुखी पडल्याची तक्रार प्राप्त झाली होती. त्या अनुषंगाने सदर पाण्याचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी तत्पर पावले उचलण्यात आलेली आहेत. त्यास अनुसरून याठिकाणी प्राधान्याने सखोल स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

घनकचरा व्यवस्थापन विभागाचे उपआयुक्त डॉ.अजय गडदे व मुख्य स्वच्छता अधिकारी नरेश अंधेर साहेब या मोहीमेप्रसंगी उपस्थित होते. ४० हून अधिक स्वच्छताकर्मींनी वाशी विभागाच्या स्वच्छता अधिकारी श्रीम. जयश्री आढळ व स्वच्छता निरीक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली या मोहीमेमध्ये धारण तलावातील भागाची व परिसराची सखोल स्वच्छता केली.

# रोह्यात पोलिसांची धडक पायी गस्त

## • वाहतूक नियमभंग करणाऱ्यांवर कडक कारवाई
## • दोषींकडून १८,५०० रुपयांचा दंड केला वसूल

**धाटाव : प्रतिनिधी**

शहरातील वाढती गर्दी, वाहतुकीचा वाढता ताण आणि नियमांचे होणारे उल्लंघन लक्षात घेऊन रोहा पोलिसांनी विशेष पायी पेट्रोलिंग मोहीम राबवली. या मोहिमेदरम्यान वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहनचालकांवर कडक कारवाई करत एकूण १८,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला.



३ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ५.०० ते ६.३० या वेळेत रोहा पोलीस ठाणे हद्दीतील बाजारपेठ, रोहा–कोलाड रोड, रायकर पार्क तसेच दमखाडी या गर्दीच्या ठिकाणी पोलिसांनी पायी गस्त घालत नागरिकांमध्ये शिस्त राखण्याचे काम केले. या वेळी विशेषतः दुचाकी चालकांकडून होणाऱ्या नियमभंगावर लक्ष केंद्रीत करण्यात आले.

कारवाईदरम्यान विना हेल्मेट दुचाकी चालवणाऱ्या १५ चालकांवर दंडात्मक कारवाई करण्यात आली. या १५ प्रकरणांतून १५,००० रुपयांचा दंड आकारण्यात आला. तसेच वाहन चालवताना आवश्यक परवाना (लायसन्स) नसलेल्या ७ जणांवरही कारवाई करत ३,५०० रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. अशाप्रकारे एकूण २२ प्रकरणांमध्ये १८,५०० रुपयांची दंड वसुली करण्यात आली.

ही संपूर्ण कारवाई रोहा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुयश कुमार सिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. विशेष म्हणजे, निरीक्षक सिंग यांनी स्वतः या मोहिमेकडे जातीने लक्ष देत संपूर्ण कारवाईची पाहणी केली. त्यामुळे पोलिसांचा धाक निर्माण होऊन नागरिकांमध्ये वाहतूक नियमांचे पालन करण्याबाबत जागरूकता वाढल्याचे दिसून आले.

पोलिसांनी केलेल्या या कारवाईमुळे नियमभंग करणाऱ्यांमध्ये काही प्रमाणात धास्ती निर्माण झाली असून, शहरातील वाहतूक शिस्त सुधारण्यास मदत होणार असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.

दरम्यान, रोहा पोलिसांकडून नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेटचा वापर करावा, वाहन चालवताना सर्व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत तसेच वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करावे. अन्यथा अशा प्रकारच्या कारवाया यापुढेही सुरूच राहतील, असा इशाराही पोलिसांनी दिला आहे.

# रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडवण्यासाठी कर्जतमध्ये बैठक

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत रेल्वे पॅसेंजर हक्क समितीच्या वतीने रेल्वे प्रवाशांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्या सोडविण्यासाठी विशेष बैठकीचे आयोजन केले होते. या सभेत बहुतांश उपस्थितांनी कोरोना पूर्वीच्या लांब पल्ल्याच्या गाड्या थांबविण्यासाठी सनदशीर मार्गाने आंदोलन करून ही समस्या सुटणार नाही, तर त्यासाठी रेल रोको आंदोलन करावे लागेल, असे मत व्यक्त केले.

कर्जतच्या श्री शनि मंदिराच्या रविकिरण सभागृहात कर्जत रेल्वे पॅसेंजर हक्क समितीने विशेष बैठकीचे आयोजन केले होते. समितीचे प्रमुख ॲड. कैलास मोरे, प्रवीण गांगल, सतीश मुसळे, प्रशांत उगले, सुरेश खानविलकर, मोहन ओसवाल, प्रभाकर करंजकर, राजाभाऊ कोठारी, विकास चित्ते, रमेश कदम, राहुल खोपकर, ॲड. योगेश देशमुख, ॲड. रवींद्र गायकवाड, ॲड. महेश घारे आदी उपस्थित होते. सुरुवातीला ॲड. मोरे यांनी बैठकीचा उद्देश सांगून उपस्थितांनी समस्या थोडक्यात मांडव्यात असे सांगितले.

प्रभाकर करंजकर यांनी, आम्ही गेली तीस पस्तीस वर्ष रेल्वे प्रवाशांच्या समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करीत होतो, आताही मी तयार आहे, असे स्पष्ट केले. कीर्ती शहासने यांनी, सकाळी सात वाजता मुंबईकडे जाणारी लोकल कधीच वेळेवर येत नाही. ती येतानाच दहा – पंधरा मिनिटे उशिरा येते. तसेच रेल्वे स्थानकावर पोलीस उपस्थित नसल्याने महिलांना भिकऱ्यांचा खूप त्रास होतो. हवी तशी स्वच्छता नाही. फलाटाच्या मध्यभागी एखादा पदचारी पूल असावा, असे सूचित केले. रेल्वे समितीचे सदस्य नितीन परमार यांनी, मी पाठपुरावा नेहमीच करीत असतो. आपल्या अनेक समस्या आहेत. सभेच्या वेळी मी त्या पोटतिडकीने मांडत असतो. तुम्ही कधीही आंदोलन करा. मी तुमच्या बरोबर आहे, असा शब्द दिला. मोहन ओसवाल, प्रवीण गांगल, रमेश कदम, सुरेश खानविलकर यांनीही आम्ही कधीही तयार आहोत, असे सांगितले.

विलास सांगळे, विजय गोखले, संजय अभंगे, राहुल खोपकर, सुमेश शेट्ये, श्रीकांत गायकवाड, तनुजा गायकर आदींनी समस्या सांगितल्या. शेवटी ॲड. मोरे यांनी आंदोलनाची दिशा ठरविण्यासाठी पुढील रविवारी १२ एप्रिल रोजी पुन्हा बैठक घेण्यात येईल. असे जाहीर केले.

याप्रसंगी कृष्णा जाधव, मालू निरगुडे, सचिन गायकवाड, विजय बेडेकर, अंकित ओसवाल, हिम्मतराज जैन, मुकेश पाटील, प्रणेश यादव, अमोल भोपतराव, गणेश जंगम, मयुरी मुसळे, इनायत परदेशी आदी उपस्थित होते.

# नाभिक समाजमंदिराला विनामूल्य रंगरंगोटी; खराडे यांचा सन्मान

**धाटाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्या नाभिक समाज पाले येथील कै. पांडुरंग रामजी सकपाळ समाजमंदिराला विनामूल्य रंगरंगोटी करून समाजाभिमानाचा आदर्श निर्माण केल्याबद्दल सुधीर खराडे यांचा कोलाड विभागाच्या वतीने सत्कार करण्यात आला.

यावेळी रायगड जिल्हा नाभिक समाजाचे विश्वस्त खराडे आण्णा, रोहा तालुका तरुण नाभिक संघाचे अध्यक्ष प्रवीण पवार, कोलाड विभागाचे अध्यक्ष विजय रावकर, जिल्हा सदस्य सदानंद साळुंखे, दुकान कमिटी अध्यक्ष किरण खंडागळे, माजी अध्यक्ष एकनाथ मोहिते, उपाध्यक्ष किरण खराडे, सचिव चंद्रकांत हुजरे, ज्येष्ठ नेते रमेश रावकर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

समाज मंदिराचे सुशोभीकरण व्हावे आणि सर्व बांधवांना स्वच्छ, आकर्षक वातावरण मिळावे या हेतूने सुधीर खराडे यांनी कोणतेही मानधन न घेता रंगरंगोटीचे काम पूर्ण केले.



# श्रीवर्धनच्या धूप प्रतिबंधक बंधाऱ्यावर पर्यटक घेतात झोप; कारवाईची मागणी

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन समुद्रकिनाऱ्यावर अंदाजे तीन किलोमीटर लांबीचा धूप प्रतिबंधक सुशोभित बंधारा बांधण्यात आलेला आहे. या बंधाऱ्यावरती बसण्यासाठी सुशोभित बाकडी, त्याचप्रमाणे झोपड्या तयार केलेल्या आहेत. तसेच या बंधाऱ्यावरती नारळाची झाडे, त्याचप्रमाणे विविध प्रकारच्या शोभेची झाडे लागवड करण्यात आली आहेत. मात्र पुण्याहून येणारे पर्यटक केव्हाही श्रीवर्धन येथे पोहोचत असतात.



रात्री, पहाटे अनेक वेळा अनेक पर्यटन व्यवसायिकांना दूरध्वनी करून रूम मिळेल का? अशी चौकशी करत असतात. सर्व पर्यटन व्यावसायिक दिवसभर आपल्या कामात व्यस्त असतात. त्यामुळे रात्रीच्या वेळी पर्यटकांना रूम देण्याचे टाळतात. कारण हरिहरेश्वर येथे काही दिवसांपूर्वी घडलेली घटना ही रात्रीच्या वेळीच घडलेली होती. यात एका तरुणीला आपले प्राण गमवावे लागले होते या धूप प्रतीबंधक बंधाऱ्यावरील स्वच्छता नियमितपणे करण्यात येत असल्याने, या ठिकाणी कोणत्याही प्रकारची दुर्गंधी किंवा कचरा पाहायला मिळत नाही. याचाच फायदा पुण्याहून येणारे पर्यटक उचलताना दिसतात.

रात्रीच्या वेळी काही पर्यटक समुद्रकिनाऱ्यावर अंथरूण टाकून झोपलेले पाहायला मिळाले. या अगोदरसुद्धा एका पर्यटकाने तंबू टाकून त्या ठिकाणी मुक्काम केल्याची गोष्ट घडली होती. जर अशाप्रकारे पर्यटकांकडून या धुप प्रतिबंधक बंधाऱ्याचा गैरवापर करण्यात येत असेल, तर त्यांच्यावर नगरपरिषदेने कारवाई करणे गरजेचे आहे.

# महाडच्या पारमाची गावात अज्ञाताने चोरले मंगळसूत्र

**महाड : प्रतिनिधी**

महाड तालुक्यातील पारमाची या गावी कल्याणहून आलेल्या महिलेच्या घरातील कपाटातील सव्वा दोन लाख रुपये किमतीचे मंगळसूत्र एका अज्ञात चोरट्याने चोरली असल्याची घटना घडली असून, याप्रकरणी महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात चोरीचा गुन्हा दाखल झाला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सौ मंगल संजय मालुसरे वय ४३ मूळ राहणार कल्याण ठाणे या १४ मार्च २०२६ रोजी पारमाची या आपल्या गावी आल्या असता, घरात कोणी नसताना एका अज्ञात चोरट्याने घराचा दरवाजा खोलून घरात प्रवेश केला व कपाटांमध्ये असलेल्या पर्समधून सव्वा दोन लाख किमतीचे साडेचार तोळे वजनाचे सोन्याचे मंगळसूत्र चोरी करून पोबारा केला. या प्रकरणी सदर महिलेने महाड औद्योगिक वसाहत पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून, अज्ञात चोट्याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे अधिक तपास करीत आहेत.

# सुभेदार मंगेश पाटील यांचा सेवानिवृत्तीपर सन्मान; तर कोमल पाटीलला शिवछत्रपती पुरस्कार प्रदान

**पाली : प्रतिनिधी**

भारत मातेच्या रक्षणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या शूर सैनिकाचा गौरव करण्याचा अभिमानास्पद क्षण रायगड जिल्ह्यातील शिहू मुंढाणी – झोतीरपाडा विभागाने अनुभवला. मुंढाणी फाटा येथे पार पडलेल्या सुभेदार मंगेश नामदेव पाटील यांच्या सेवानिवृत्ती व आंतरराष्ट्रीय जलतरणपट्टू कोमल मंगेश पाटील यांच्या शिवछत्रपती पुरस्कार सन्मान सोहळ्याने देशभक्ती, गौरव, कर्तव्यनिष्ठा आणि त्याग यांचा भावनिक संगम घडवून आणला.



सुभेदार मंगेश पाटील यांनी दीर्घकालीन सैन्य सेवेत अनेक आव्हानांना सामोरे जात देशाची सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्यांच्या शौर्य, शिस्त आणि समर्पणामुळे केवळ त्यांचे कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण रायगड जिल्हा त्यांच्या कार्याचा अभिमान बाळगतो. त्यांच्या सेवेमुळे अनेक तरुणांना देशसेवेची प्रेरणा मिळाली आहे.

या प्रसंगी सुभेदार मंगेश पाटील यांनी मनोगतात सांगितले की, “भारत मातेची सेवा करण्याचे भाग्य लाभले, हे माझे सौभाग्य आहे. आता सेवा निवृत्तीनंतर माझ्या जन्मभूमीची सेवा करण्यासाठी मी स्वतःला वाहून घेणार आहे. तर या विभागातील जास्तीत जास्त तरुण देशसेवेस कसे जातील यासाठी ही माझे प्रयत्न असतील. यावेळी त्यांनी सैन्य कार्यकाळातील अनेक संघर्षमय व कष्टप्रद किस्से व अनुभव नमूद केले.

निवृत्तीनंतरही समाजकार्य, युवकांना मार्गदर्शन आणि राष्ट्रप्रेमाची भावना जागृत ठेवण्याचा संकल्प त्यांनी व्यक्त केला. त्यांच्या अनुभवाचा लाभ समाजाला होणार असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक युवक घडतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

हा सोहळा केवळ निवृत्तीचा नव्हता, तर एका नव्या सामाजिक प्रवासाची सुरुवात होती. सुभेदार मंगेश पाटील यांचे आयुष्य हे देशसेवा, प्रामाणिकपणा आणि कर्तव्यपरायणतेचे जिवंत उदाहरण आहे. त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन समाजाने पुढे जाणे, याच त्यांच्या प्रति शुभेच्छा ठरतील, असे उपस्थित मान्यवरांनी मनोगतात सांगितले.

या कार्यक्रमास पंचायत समिती सदस्य संजय भोईर, संपर्कप्रमुख प्रसाद भोईर, उद्योजक जयवंत कुथे, सामाजिक कार्यकर्ते उद्धव कुथे, नामदेव पाटील, सुगंधा पाटील, नरेश पाटील, सुनील पाटील (पोलीस), मनोहर पाटील, हेमंत पाटील, रमेश किर्वे, मोहन पाटील, यदीश कुथे, एकनाथ पाटील, गणपत पाटील, प्रेमनाथ पिंगळे,नारायण पाटील, प्रदीप पाटील, माजी सरपंच सोनम पाटील, अनिता पाटील, संगीता पाटील, वैजयंती कुथे, अरुणा म्हात्रे, सुरेखा ठाकूर, पत्रकार धम्मशील सावंत आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.



नागोठणे : रायगड जिल्हा परिषद अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांनी जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज पालखी सोहळ्याचे दर्शन घेतले.

# पेणमध्ये राज्यस्तरीय नाट्य महोत्सव रंगणार

**पेण : प्रतिनीधी**

दत्त अवधूत एंटरटेनमेंट आणि स्वरसंग पेण यांच्या संयुक्त विद्यमाने पेणमध्ये राज्यस्तरीय दोन अंकी नाट्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवात तब्बल १२ दिवस १२ दर्जेदार नाटकांचे सादरीकरण होणार असून, प्रेक्षकांना विनामूल्य प्रवेश देण्यात आला आहे.

हा भव्य नाट्य महोत्सव १९ एप्रिल २०२६ ते १ मे २०२६ दरम्यान दररोज सायंकाळी ७ वाजता कौशिकी हॉल, दत्ता नगर गेट क्रमांक २, पेण बोरगाव रोड येथे आयोजित करण्यात आला आहे. महोत्सवामध्ये राज्यभरातील विविध नाट्यसंस्थांचा सहभाग असून, दररोज वेगवेगळ्या विषयांवरील नाटके सादर केली जाणार आहेत. यामध्ये ‘डिंक’, ‘खाजगीवाली’, ‘अजून अंधार दाटून आहे’, ‘नकळत दिसले सारे’, ‘कोणाकडे होतो जी कोणाची सोय’, ‘करमणूक टाइम्स’, ‘ती ती आणि ती’, ‘अनपेक्षित’, ‘विदूषक’, ‘ब्रेकपॉईंट’, ‘तहान’ आणि ‘पुनरागमन’ अशा नाटकांचा समावेश आहे.

या उपक्रमामुळे पेण शहरातील नाट्यप्रेमींना दर्जेदार रंगभूमीचा अनुभव घेण्याची संधी मिळणार असून, स्थानिक कलाकारांना देखील व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. सांस्कृतिक चळवळीला चालना देणारा हा उपक्रम ठरणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांतून व्यक्त होत आहे.

# कळंबोलीतील भोंदूबाबाची खालापुरात काळी कृत्ये, पोलिसांनी ठोकल्या बेड्या!

**खालापूर : प्रतिनिधी**

नाशिक येथील भोंदूबाबा प्रकरणानंतर नवी मुंबई, रायगडातील भोंदूबाबाचे प्रकरण उघडकीस येत आहेत. कळंबोली येथील अकबर रशिद शेख ऊर्फ बाबा जान याच्यावर खालापूर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.





पीडित विवाहितेचे पतीसोबत पटत नसल्याने ती शेखकडे गेली होती. हा भोंदूबाबा तिला काळी जादू करण्याच्या बहाण्याने खालापुरातील महड येथे बोलावून कपडे उतरवण्यास लावत असे. यावेळी शारीरिक संबंध न ठेवल्यास काळी जादू करेन आणि जीवे ठार मारीन, अशी धमकी देत भोंदूने तिच्या इच्छेविरुद्ध बळजबरीने शारीरिक संबंध प्रस्थापित केले. याबाबत पीडित विवाहित महिलेने रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांची भेट घेऊन सविस्तर माहिती त्यांच्या कानावर घातली. याबाबत खालापूर पोलिसांनी गुन्हा दाखल करून भोंदूबाबाला अटक केली. आणखी काही गुन्हे या भोंदूबाबाने केले आहेत याची चौकशी केली जात आहे.

याबाबत माहिती देताना खालापूर उपविभागीय पोलीस अधिकारी विशाल नेहूल यांनी सांगितले की, पीडित विवाहित महिलेचे तिच्या पतीबरोबर पटत नसे तसेच नवऱ्याचे इतर महिलांबरोबर अफेअर असल्याची शंका होती. यावर उपाय मिळावा व सल्ला घेण्यासाठी पीडित महिला बाबा जान यांच्याकडे गेली असता तिला एकटीला खालापुरातील महड येथे निर्जन ठिकाणी असणाऱ्या फार्महाऊसवर बोलावून तिच्या इच्छेविरुद्ध त्याने शारीरिक संबंध ठेवले. मुस्लिम सत्यशोधक मंडळाने पुढाकार घेत पीडितेला पाठबळ देऊन खालापूर पोलीस ठाण्यात आणले. या प्रकरणी अधिक तपास सुरू आहे.

# चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया आणि लेविकॉन इंडिया सिस्टीमतर्फे इव्ही कार चार्जिंग सेंटरचे उद्घाटन

**पेण : प्रतिनीधी**

चिल्ड्रन्स फ्युचर इंडिया आणि लेविकॉन इंडिया सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड यांच्या संयुक्त विद्यमाने इव्ही कार चार्जिंग सेंटरचे उद्घाटन शुक्रवार, ३ एप्रिल रोजी पेण नगरपालिकेचे गटनेते अनिरुद्ध पाटील यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी त्यांच्या समवेत माजी नगरसेवक राजा म्हात्रे, माजी नगरसेवक दिलीप लाड, माजी नगरसेवक कुणाल नाईक, उद्योजक सचिन शिगवण उपस्थित होते.



यावेळी लेविकॉन इंडिया सिस्टीम प्रा. लि.एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर केदार नाडगौंडी व चिल्ड्रन्स फ्युचर इंडियाचे डायरेक्टर तथा सीईओ डॉ. किशोर देशमुख यांच्या माध्यमातून पेण शहरात सीएफआय संस्थेजवळ प्रथमच इ व्ही कार चार्जिंग सेंटरची शानदार सुरुवात करण्यात आली असल्याने कमी दरात आणि काही मिनिटातच कार, बाईक या चार्जिंग होणार असल्याने येथे येणाऱ्या प्रवासी, कारचालक यांना हे चार्जिंग सेंटर अत्यंत महत्वाचे ठरणार आहे. याचा पर्यटकांना फायदा होऊन पर्यटनाला चालना मिळणार असून पर्यावरणातील प्रदूषणाची समस्या थांबण्यास मदत होणार आहे.

यावेळी लेविकॉन इंडिया सिस्टीम प्रा. लि.एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर केदार नाडगौंडी यांनी माहिती देताना सांगितले की सीएफआय संस्थेच्या माध्यमातून कमी वेळात फास्ट चार्जिंग सेंटरची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे यात लेविकॉन ॲप वापरून चार्जिंग करता येणार असून आपल्याला लागणाऱ्या चार्जिंगचे दर क्यू आर कोडद्वारे भरता येणार आहे.

लेविकॉन इंडिया ही IT, सोलर, IoT, स्मार्ट सोल्यूशन्स आणि EV चार्जिंग क्षेत्रातील अग्रगण्य कंपनी आहे,आधुनिक तंत्रज्ञान आणि शाश्वत ऊर्जा यांचा संगम घडवून ती उद्योग, शहरे आणि समाजासाठी स्मार्ट उपाय प्रदान करत असल्याचे संचालक केदार नाडगौंडी यांनी माहिती देताना सांगितले.

यावेळी नगरसेवक अनिरुद्ध पाटील यांनी अत्याधुनिक सुविधा नागरिकांना मिळत असल्याने भविष्यही नागरिकांचा फायदा होणार असल्याने केदार नाडगौंडी व डॉ.किशोर देशमुख यांच्या माध्यमातून सुरू केलेल्या उपक्रमाचे कौतुक केले तर नगरपालिकेच्या माध्यमातून अशाप्रकारे उपक्रम शहरातील नागरिकांसाठी राबवण्यात येतील असेही त्यांनी सांगितले.

# राजस्थानचा गुजरातवर रोमांचक विजय



**अहमदाबाद : वृत्तसंस्था**

राजस्थान रॉयल्सने गुजरात टायटन्सविरूद्ध सामन्यात २०व्या षटकातील अखेरच्या चेंडूवर विजय मिळवला. मराठमोळ्या तुषार देशपांडेने उत्कृष्ट २०वे षटक टाकत राजस्थानला सहा धावांनी रोमांचक विजय मिळवून दिला. राजस्थानने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्यांचा पाठलाग करताना गुजरात टायटन्सचा संघ २० षटकांत २०४ धावाच करू शकला. तुषारच्या अखेरच्या षटकापूर्वी रवी बिश्नोईचे चार षटकांत चार विकेट्स या सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरले.

अखेरच्या षटकात गुजरातला विजयासाठी ११ धावांची गरज होती. राजस्थानने हे षटक टाकण्याची जबाबदारी तुषार देशपांडेला गोलंदाजीची संधी दिली, तर फलंदाजीसाठी राशीद खान व कगिसो रबाडा मैदानावर होते. तुषारने पहिला चेंडू वाईट टाकला. यासह सहा चेंडूत नऊ धावांची गरज होती. पहिल्या तिन्ही चेंडूवर सिंगल्स काढण्यात आल्या. त्यानंतर चौथा चेंडू डॉट बॉल राहिला. तुषारच्या पाचव्या चेंडूवर मोठा फटका खेळण्याच्या प्रयत्नात रशीद खान झेलबाद झाला. रशीद बाद झाल्यावर अशोक शर्मा फलंदाजीला आला आणि अखेरचा चेंडू डॉट बॉल राहिल्याने राजस्थानने सहा धावांनी सामना जिंकला.

राजस्थान रॉयल्सने दिलेल्या २११ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना चांगली सुरुवात झाली. साई सुदर्शन व कुमार कुशाग्र यांनी ७८ धावांची भागीदारी रचली. कुमारने १४ चेंडूत तीन चौकारांसह १८ धावांची खेळी केली. सुदर्शनने ४४ चेंडूत नऊ चौकार व तीन षटकारांसह ७३ धावांची खेळी केली, तर जोस बटलरने १४ चेंडूत पाच चौकार २६ धावा केल्या. त्यानंतर रवी बिश्नोईने इम्पॅक्ट प्लेअर म्हणून येत गुजरातला धक्के दिले.

तत्पूर्वी राजस्थानने नाणेफेक जिंकत प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतला होता. राजस्थानला वैभव सूर्यवंशी व यशस्वी जैस्वाल यांनी संघाला दणक्यात सुरुवात करून दिली. दोघांनी पहिल्या विकेटसाठी ७० धावांची भागीदारी रचली. वैभव १८ चेंडूत पाच चौकार व एका षटकारासह ३१ धावा करत बाद झाला. यशस्वीने ३६ चेंडूत सहा चौकार व तीन षटकारासह ५५ धावा केल्या. ध्रुव जुरेलने ४२ चेंडूत पाच चौकार व पाच षटकारांसह ७५ धावा केल्या, तर शिमरॉन हेटमायरने १८ धावांचे योगदान दिले. यासह राजस्थानने २१० धावांचा आकडा गाठला. गुजरातकडून कगिसो रबाडाने सर्वाधिक दोन विकेट्स घेतल्या. याशिवाय सिराज, अशोक शर्मा, प्रसिध कृष्णा आणि रशीद खान यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

# अशोक शर्मा भारताची नवी स्पीडगन

## आयपीएलमध्ये वेगवान चेंडू टाकून दिग्गजाचा विक्रम मोडला



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

इंडियन प्रीमियर लीगमध्ये अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर राजस्थान रॉयल्सविरुद्ध झालेल्या सामन्यात गुजरात टायटन्सचा वेगवान गोलंदाज अशोक शर्माने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. २३ वर्षीय अशोकने या हंगामातील सर्वात वेगवान चेंडू टाकत खळबळ उडवून दिली आहे. अशोकने डावाच्या १६व्या षटकातील शेवटचा चेंडू प्रतितास १५४ किमी वेगाने टाकण्याचा पराक्रम गाजवला. हा या हंगामातील सर्वात वेगवान चेंडू ठरला आहे.

२३ वर्षीय अशोक शर्माने राजस्थान रॉयल्सविरुद्धच्या सामन्यात ध्रुव जुरेलला १५४.२ किमी प्रतितास वेगाचा 'यॉर्कर' टाकला. आपल्या संपूर्ण स्पेलमध्ये शर्माने सातत्याने १४५ किमी प्रतितासपेक्षा जास्त वेगाने गोलंदाजी केली आणि एकाच षटकात दोनदा १५० किमीचा टप्पा ओलांडला. यासह त्याने एनरिक नॉर्कियाचा १५०.९ किमी प्रतितास वेगाचा विक्रम मोडीत काढला. अशोकने आपल्या चार षटकांच्या स्पेलमध्ये १/३७ अशी कामगिरी नोंदवली आणि शिमरॉन हेटमायरची विकेट घेतली.

अशोक शर्माने ३१ मार्च रोजी पंजाब किंग्सविरुद्ध आयपीएलमध्ये पदार्पण केले. पहिल्याच चेंडूवर त्याने १४९.७ किमी प्रतितास वेग नोंदवून अपेक्षा पूर्ण केल्या. लवकरच त्याने मार्को जॅन्सनला 'बॅक-ऑफ-द-हँड' स्लोअर बॉलवर बाद करून आपली पहिली आयपीएल विकेट घेतली आणि १/३१ अशा कामगिरीसह सामना संपवला.

अशोक शर्मा कोलकाता नाईट रायडर्स आणि राजस्थान रॉयल्सच्या संघात होता, पण त्याला अंतिम ११मध्ये संधी मिळाली नव्हती. आता २०२६च्या लिलावात गुजरात टायटन्सने ९० लाख रुपयांना विकत घेतलेल्या अशोकचा निर्णय सार्थ ठरत आहे. जो खेळाडू एकेकाळी क्रिकेट सोडण्याच्या तयारीत होता, तो आज लीगमध्ये सर्वात वेगवान गोलंदाज बनला आहे.

### संघर्ष अन् खडतर प्रवास

अशोक शर्मा जयपूरजवळील रामपुरा गावातील आहे. त्याच्या क्रिकेटच्या प्रवासामागे मोठा संघर्ष आहे. एका सामान्य शेतकरी कुटुंबात वाढलेल्या अशोकच्या घरी आर्थिक परिस्थिती बेताची होती. मोठा भाऊ अक्षय याने स्वतःच्या क्रिकेटच्या महत्त्वाकांक्षा बाजूला ठेवून अशोकला प्रोत्साहन दिले. अशोकचा हा प्रवास सोपा नव्हता. अंडर-२३ स्तरावर संधी न मिळाल्याने त्याने क्रिकेट सोडण्याचाही विचार केला होता, मात्र २०२५-२६ च्या सय्यद मुश्ताक अली ट्रॉफीमध्ये त्याने १० सामन्यांत २२ विकेट्स घेत जबरदस्त कामगिरी केली. यानंतर त्याने मागे वळून पाहिले नाही.

# एका संघाविरुद्ध षटकार ठोकण्यात हिटमॅन रोहितने मोडला धोनीचा विक्रम



**मुंबई : प्रतिनिधी**

भारताचा आणि मुंबई इंडियन्सचा माजी कर्णधार रोहित शर्मा याने दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या आयपीएलमधील दुसऱ्या सामन्यात छोट्याखानी खेळीसह मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. पहिल्या सामन्यात अर्धशतकी खेळी साकारणाऱ्या रोहितने दुसऱ्या सामन्यात २६ चेंडूत ३५ धावांची उपयुक्त खेळी करताना एक उत्तुंग षटकार मारला. या षटकारासह त्याने आयपीएलमध्ये एका फ्रँचायझी संघाविरुद्ध सर्वाधिक षटकार मारण्याचा महेंद्रसिंह धोनीचा विक्रम मोडीत काढला आहे.

३८ वर्षीय उजव्या हाताच्या बॅटरने दिल्ली येथील अरुण जेटली स्टेडियमवर दिल्ली कॅपिटल्सविरुद्धच्या सामन्यात आपल्या खेळीत पाच चौकार आणि एक षटकार ठोकला. तो यंदाच्या हंगामातील सलग दुसरे अर्धशतक झळकावण्याच्या मूडमध्ये असल्याचे दिसत असताना अक्षर पटेलने त्याच्या खेळीला ब्रेक लावला. नितीश राणा याने त्याचा सर्वोत्तम झेल टिपला, पण त्याआधी हिटमॅन रोहितच्या नावे खास विक्रमाची नोंद झाली होती. आयपीएलमध्ये एका संघाविरुद्ध सर्वाधिक षटकार मारणाऱ्या खेळाडूंच्या यादीत तो अव्वलस्थानी पोहचला आहे.

याआधी हा विक्रम चेन्नई सुपर किंग्सचा माजी कर्णधार महेंद्रसिंह धोनीच्या नावे होता. धोनीने आपल्या आतापर्यंतच्या आयपीएल कारकिर्दीत रॉयल चॅलेंजर्स बंगळुरुविरुद्ध सर्वाधिक ५० षटकार मारले होते. हिटमॅन रोहित शर्माने दिल्लीविरुद्ध विराज निगमच्या गोलंदाजीवर ५१वा षटकार मारत नवा विक्रम प्रस्थापित केला.

आयपीएलमधील भारतासह परदेशी खेळाडूंचा विचार केला तर एका संघाविरुद्ध सर्वाधिक षटकार मारणाऱ्या फलंदाजांच्या यादीत ख्रिस गेल अव्वलस्थानी आहे. गेलने पंजाब किंग्सविरुद्ध १६ सामन्यांत ६१ षटकार ठोकले आहेत तसेच कोलकाता नाईट रायडर्सविरुद्ध त्याच्या खात्यात १९ सामन्यांत ५४ षटकारांची नोंद आहे.

# आयपीएलमध्ये वैभव-यशस्वीने इतिहास घडवला

## सर्वात जलद ५०० धावा करणारी ठरली पहिलीच जोडी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमध्ये पहिल्याच डबल हेडरमधील दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि गुजरात टायटन्स यांच्यात खेळवला गेला. या सामन्यात वैभव सूर्यवंशी व यशस्वी जैस्वालच्या जोडीने इतिहास घडवला आहे. १८ वर्षांच्या आयपीएल इतिहासात कोणत्या जोडीला जमले नाही ते या दोन तरुण फलंदाजांनी करून दाखवले आहे.

राजस्थानच्या सलामीवीरांनी गुजरातविरूद्ध वादळी सुरुवात केली. चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या सामन्यात वैभवने ५२ धावा आणि जैस्वालने ३८ धावा करत आपल्या मोहिमेची दमदार सुरुवात केली होती. टायटन्सविरुद्धही त्यांनी तोच फॉर्म कायम ठेवला. या जोडीने अवघ्या २६ चेंडूत ५० धावांची आक्रमक भागीदारी करत राजस्थानला मजबूत स्थितीत पोहचवले. यासोबतच या जोडीने आयपीएलमध्ये एकत्रित ५०० धावांचा मोठा टप्पाही गाठला.

# जेम्स अँडरसनचा वयाच्या ४३व्या वर्षी 'पंजा'



**लंडन : वृत्तसंस्था**

वय हा फक्त एक आकडा आहे, हे इंग्लंडचा दिग्गज वेगवान गोलंदाज जेम्स अँडरसनने सिद्ध करून दाखवले आहे. वयाची चाळीशी ओलांडली तरी फिटनेस आणि जिद्दीच्या जोरावर त्याने देशांतर्गत क्रिकेटमध्ये पाच बळी टिपत एक नवा आदर्श निर्माण केला आहे. ४३व्या वर्षीही अँडरसनचा हा 'स्पेल' पाहून तरुण गोलंदाजही थक्क झाले आहेत.

अँडरसनने काउंटी क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा शानदार गोलंदाजी करत एका डावात पाच बळी घेतले. त्याच्या प्रथम-श्रेणी कारकिर्दीत पाच बळी घेण्याची ही ५६वी वेळ आहे. लँकेशायरकडून खेळताना त्याने नॉर्थम्प्टनशायरविरुद्ध ही कामगिरी केली. अँडरसनने १३ षटकांत ६४ धावा देऊन पाच बळी घेत आपल्या संघाला मजबूत स्थितीत आणले.

विरोधी फलंदाज अँडरसनच्या गोलंदाजीचा सामना करू शकले नाहीत. त्याने आघाडीच्या आणि मधल्या फळीला खिंडार पाडत महत्त्वपूर्ण बळी घेतले. त्याचा स्विंग आणि लाईन-लेंथ इतके अचूक होते की फलंदाजांकडे काही पर्यायच नव्हता. विशेष म्हणजे, या वयातही त्याचा फिटनेस आणि लय एखाद्या तरुण गोलंदाजाशी तुलना करण्यासारखी होती.

# कसोटी क्रिकेटसाठी बीसीसीआयचा आराखडा

**बंगळुरू : वृत्तसंस्था**

भारताने सलग दोन वेळा टी-२० विश्वचषक जिंकला असला, तरी त्यामागे कसोटी क्रिकेटमधील वाढती समस्या लपून राहिलेली नाही. संघाच्या कसोटीतील कामगिरीत लक्षणीय घसरण झाली आहे. याच पार्श्वभूमीवर आता बीसीसीआयने मोठा निर्णय घेत आराखडा तयार केला आहे.

गेल्या काही काळात भारताने घरच्या मैदानावर न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेविरुद्ध कसोटी मालिका गमावल्या. या पराभवांनी हे स्पष्ट केले आहे की, भारत आता मायदेशातील परिस्थितीतही अजिंक्य राहिलेला नाही. त्यामुळे जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या अंतिम फेरीत पोहचण्याच्या भारताच्या आशा आता अधिकच कमी होताना दिसत आहेत. बीसीसीआयने कसोटी क्रिकेटचे भविष्य मजबूत करण्यासाठी एक आराखडा तयार केला आहे. व्हीव्हीएस लक्ष्मण यांच्या नेतृत्वाखालील सेंटर ऑफ एक्सलन्स (सीओई) अंतर्गत विकसित करण्यात आलेली ही योजना युवा खेळाडूंवर लक्ष केंद्रित करेल.

सेंटर ऑफ एक्सलन्समध्ये चार दिवसीय कसोटी सामने खेळवले जाणार आहेत. यामध्ये २५ वर्षांखालील ६४ खेळाडूंना चार संघांमध्ये विभागले जाईल. येत्या वर्षभर लाल चेंडूच्या क्रिकेटच्या विकासाला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचना प्रशिक्षक आणि निवडकर्त्यांना देण्यात आल्या आहेत.

### युवा खेळाडूंना मिळणार संधी

सीओईने तयार केलेल्या या मास्टर प्लॅनचा एक भाग म्हणून जून-जुलैमध्ये बंगळूरु येथील सीओईमध्ये एक अंतर्गत सीओई स्पर्धा आयोजित केली जाईल, ज्यामध्ये २५ वर्षांखालील ६४ अव्वल युवा क्रिकेटपटू सहभागी होतील. या स्पर्धेचा उद्देश भारतातील लाल चेंडूच्या क्रिकेटमधील प्रतिभावान खेळाडूंचा साठा मजबूत करणे आणि पुढील दशकासाठी एक भक्कम पुरवठा साखळी तयार करणे हा आहे. वैभव सूर्यवंशी आणि आयुष म्हात्रे यांसारख्या युवा खेळाडूंना चार दिवसीय लाल चेंडूचे सामने खेळण्याची संधी मिळेल.

# हार्दिक पांड्या कमबॅक करणार





**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई इंडियन्सने आतापर्यंत दोन सामने खेळले आहेत, तर तिसरा सामना ७ एप्रिलला गुवाहाटीत राजस्थान रॉयल्स संघाविरुद्ध होणार आहे. वृत्तानुसार या सामन्यासाठी मुंबई इंडियन्सचा संघ गुवाहाटीला रवाना झाला असून कर्णधार हार्दिक पांड्यादेखील गुवाहाटीला रवाना झाला आहे.

हार्दिक पांड्याची तब्येत इतकी खराब नव्हती. पण मुंबई इंडियन्स संघाला कुठलीही जोखीम घ्यायची नव्हती. त्यामुळे त्याला विश्रांती देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. हार्दिकच्या अनुपस्थितीत सूर्यकुमार यादव संघाचे नेतृत्व करताना दिसून आला होता. आता हार्दिक पुनरागमन करणार असल्याचे समजते.






ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।
विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।
सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।
तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

वर्ष २१ वे

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत
माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित
वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.




अखंड हरिनाम सप्ताह
ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा
व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

प्रारंभ चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६
देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता
सांगता चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

दैनंदिन कार्यक्रम
पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

सोमवार, दि. ०६/४/२०२६
सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

काल्याचे कीर्तन: मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय
ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com